| धाराशिव | वर्ष २६ वे | अंक ८८ वा | बुधवार दिनांक १० जून, २०२६ | पृष्ठे ६ | किंमत ०१ ₹ RNI MAHMAR/2003/11649

# लातूर समाचार

(सांज दैनिक)
प्रकाशन: धाराशिव (उस्मानाबाद आवृत्ती)
पोष्ट परवाना L2/RNP/OMD- 52/24-26

dainiklatursamachar@gmail.com
संस्थापक : स्व. शंकर माधव जडे (स्वातंत्र्य सैनिक)

## अळणी येथे पोलीस उपअधीक्षकांच्या पथकाची जुगार अडड्यांवर छापेमारी



धाराशिव (प्रतिनिधी)-धाराशीव जिल्ह्यामध्ये अवैध व्यवसायांचे समूळ उच्चाटन करण्यासाठी पोलीस प्रशासनाने मोहीम तीव्र केली आहे. या बाबात पोलिसाकडून समजलेली माहिती अशी की, पोलीस अधीक्षक श्रीमती रीतु खोखर आणि अपर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर यांच्या मार्गदर्शनाखाली दिनांक ०८ जून २०२६ रोजी लातूर-ढोकी रोडवरील अळणी येथे 'दर्शन बियर बार आणि परमिट रूम'च्या आडोशाने अवैध रित्या चालविण्यात येत असलेल्या तीन पत्ती (तिरट) क्लबवर छापेमारीची धडक कारवाई करण्यात आली. सदर कारवाईमध्ये परि. पोलीस उपअधीक्षक अमोल मोहिते यांच्यासह सहाय्यक पोलीस निरीक्षक प्रवीण सोमवंशी , सुरेश कासुळे, पोलीस उपनि. रामचंद्र बहुरे, क्यू.आर.टी. (QRT) व आर. सी.पी. (RCP) अंमलदार आणि चालकांच्या पथकाने सहभाग घेतला.

**गोपनीय माहितीच्या आधारे धाड**

परि. पोलीस उपअधीक्षक श्री. अमोल मोहिते यांना मिळालेल्या खात्रीशीर गोपनीय माहितीच्या आधारे ही योजनाबद्ध कारवाई करण्यात आली. संबंधित बियर बार आणि परमिट रूम येथे पैशांच्या बदल्यात कॉईन्स देऊन त्या माध्यमातून जुगार खेळवला जात होता. सदर जुगाराचे ठिकाण बारचा मागे चहूबाजूंनी शेताने वेढलेले असल्याने सहजासहजी नजरेस पडत नव्हते. परंतु, पोलिसांची छापेमारी इतकी नियोजनबद्ध होती की, संशयितांना पळून जाण्याची संधी मिळाली नाही. सदर कारवाईदरम्यान घटनास्थळावरून एकूण १२ संशयितांना ताब्यात घेण्यात आले असून, बार मालक श्रीपाद याच्याविरुद्ध 'महाराष्ट्र जुगार प्रतिबंधक अधिनियम, १८८७' नुसार गुन्हा नोंद करण्यात आला आहे. संशयितांकडून जुगाराच्या साहित्यासह(पत्ते ,कॉइन)मोबाईल,२ चारचाकी वाहने, ४ दुचाकी वाहने व इतर मुद्देमाल, असा एकूण रु. २१,९०,३०५/- (अक्षरी: एकवीस लाख नव्वद हजार तीनशे पाच रुपये फक्त) किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

## मोटरसायकल कारला धडकुन अपघात एकाचा मृत्यू तर दुसरा जखमी

धाराशिव (प्रतिनिधी)- धाराशिव ग्रामीण पोलीस ठाणे अंतर्गत जखमी विक्रम यशवंत जगदाळे, वय ५४ वर्षे, रा. उपळा ता. जि. धाराशिव व सोबत मयत कस्तुराबाई बलभिम पारवे, वय ४७ वर्षे, रा. बरमगाव ता. जि. धाराशिव हे दि.२५.०५.२०२६ रोजी मोटरसायकल वरुन जात होते. दरम्यान इरटीगा कार चा चालकाने त्याचे ताब्यातील इरटीगा कार ही हायगईने व निष्काळजीपणे चालवून फिर्यादी आकाश विनायक तेरकर, वय २९ वर्षे, रा. गावसुद ता. जि. धाराशिव यांचे कारला पाठीमागून धडक दिली. त्यामुळे फिर्यादीची कार रस्त्यावर अचानक आडवी होवून विक्रम जगदाळे यांची मोटरसायकल कारला धडकुन अपघात झाला. या अपघातात कस्तुराबाई पारवे या गंभीर जखमी होवून मयत झाल्या. तर विक्रम जगदाळे हे किरकोळ व गंभीर जखमी झाले. अशा मजकुराच्या फिर्यादी नामे- आकाश तेरकर यांनी दि.०६.०६.२०२६ रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन धाराशिव ग्रामीण पो ठाणे येथे भा.न्या.सं. कलम १०६(१), १२५(ए), १२५(बी), २८१, सह कलम १८४, १३४(ए) (बी) अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

## मुसळधार पावसात भाविक चिंब; मंदिर संस्थानच्या ढिसाळ नियोजनाचा फटका

तुळजापूर (प्रतिनिधी)- शहर आणि परिसराला रविवार (दि. ०७) रोजी जोरदार पावसाने झोडपले. मुसळधार पावसामुळे सर्वत्र पाणीच पाणी झाले. दरम्यान, जोरदार पावसात भाविकांच्या चपला वाहून गेल्याने भाविकांना चिखल आणि पावसात चपलांचा शोध घ्यावा लागला, त्यामुळे भाविकांमध्ये संताप व्यक्त करण्यात येत होता.

रविवारी रात्री ९ वाजता पावसाला सुरुवात झाली. रात्री उशिरापर्यंत जोरदार पावसाने हजेरी लावली. अचानक पावसाला सुरुवात झाल्याने भाविकांची तारांबळ उडाली. पावसाचा जोर अधिक असल्याने शहरातील सर्व रस्त्यांवर पाणी वाहू लागले.

दरम्यान, बिडकर पायऱ्यांसमोरील मंदिर संस्थानच्या चप्पल स्टॅन्डमध्ये ठेवलेल्या चपला मुसळधार पावसात वाहून गेल्या. चिखल आणि पावसाच्या पाण्यात चपला शोधताना भाविकांची मोठी दमछाक झाली. मंदिर संस्थानच्या ढिसाळ नियोजनाबाबत भाविकांमध्ये संताप व्यक्त करण्यात येत होता. दरम्यान, दिवसभर कडक उन्हामुळे त्रस्त झालेल्या नागरिकांना रात्री झालेल्या जोरदार पावसामुळे उकाड्यापासून दिलासा मिळाला. पावसाळ्यातील पहिल्याच जोरदार पावसाने शेतकरी सुखावला असून पेरणीच्या तयारीला लागला आहे.

कर्मचाऱ्यांविना स्टॅन्ड सद्या भाविकांना महाद्वार ऐवजी बिडकर पायऱ्यांमार्गे मंदिरात सोडण्यात येत आहे. बिडकर पायऱ्यांसमोर कुंभार गल्लीत मंदिर संस्थानच्या वतीने तात्पुरते चप्पल स्टॅन्ड उभारण्यात आले आहे. मात्र या ठिकाणी मंदिर संस्थानने कर्मचाऱ्यांची नियुक्ती केली नसल्याने भाविकांना चप्पला राम भरोसे सोडाव्या लागत असून स्वतःच चप्पलांचा ढिगाऱ्यात हात घालून चप्पला शोधाव्या लागत आहेत.

## कळंबमध्ये दमदार पावसामुळे पेरणीच्या कामांना गती

कळंब (प्रतिनिधी)-पावसाळ्याच्या सुरुवातीलाच झालेल्या जोरदार पावसामुळे नद्या, नाले वाहू लागले आहेत. यामुळे शेतकरी वर्गात समाधानाचे वातावरण निर्माण झाले आहे. यामुळे शेतकऱ्यांनी खतांच्या दुकानांमध्ये गर्दी केलेली दिसून येत होती तर काही पर्यायी रस्त्यांचे नुकसान झाले असून, परिणामी या मार्गावरील वाहनांची ये-जा थांबवण्यात आली आहे.

जून ते सप्टेंबर या कालावधीत पाऊस पडतो. मागील वर्षी मे महिन्यात अवकाळी पाऊस सुरू झाला होता. त्यानंतर जून महिन्यात झालेल्या पावसामुळे शेतकऱ्यांनी खरीप पेरणीची लगबग केली होती. जुलै महिन्यातील पाऊस पिकांसाठी वरदान ठरला असला, तरी बहुतांश भागात सरासरीपेक्षा कमी पाऊस झाला. मात्र ऑगस्ट महिन्यात पावसाचा हाहाकार झाला. होत्याचे नव्हते झाले. या महिन्यात शेतात डोलणारी पिके अतिवृष्टीमुळे पाण्यात तरंगत होती. यामुळे हातातोंडाशी आलेला घास वाहून गेला. या अतिवृष्टीमुळे शेतीचे अतोनात नुकसान झाले. यावर्षी शेतकऱ्यांनी मे महिन्यात पेरणीपूर्व मशागत, नांगरणी तसेच इतर शेतीकामांना सुरुवात केली होती. दरम्यान, समाधानकारक पाऊस झाल्यामुळे शेतकऱ्यांनी खतांच्या दुकानांमध्ये गर्दी केली होती. मात्र यावेळी युरिया व डीएपी खतांची टंचाई असल्यामुळे शेतकऱ्यांना इतर पर्यायी खते खरेदी करावी लागत आहेत. यंदा पावसाचे आगमन वेळेत झाल्याने शेतकऱ्यांमध्ये आशावादाचे वातावरण आहे. मागील काही वर्षांत अनियमित पावसामुळे शेतीचे मोठे नुकसान सहन करावे लागले होते. मात्र यावर्षी हंगामाच्या सुरुवातीलाच चांगला पाऊस झाल्याने हंगामातील खरीप पिकांसाठी पोषक परिस्थिती निर्माण झाली आहे.

मोहा मंडलामध्ये सर्वाधिक पाऊस कळंब तालुक्यातील कळंब मंडळात ९९ मिमी, इटकूर ४५ मिमी, येरमाळा ३७ मिमी, मोहा ११९ मिमी, शिराढोण ३० मिमी, गोविंदपूर ८२ मिमी पाऊस झाला आहे. सर्वाधिक पाऊस मोहा मंडळात झाला असून सर्वात कमी शिराढोण मंडळात नोंदवला गेला आहे.

शेतकऱ्यांची पेरणीसाठी तयारी, खतांच्या दुकानांमध्ये गर्दी विशेष म्हणजे खामसवाडी, करंजकल्ला, मंगरूळ, भाटशिरपूरा यासह विविध गावांजवळील ओढ्यांतून पाणी वाहिले आहे. त्यामुळे काही ठिकाणी वाहतूक काही काळासाठी विस्कळीत झाली होती. तसेच समाधानकारक पाऊस झाल्यामुळे शेतकऱ्यांनी खतांच्या दुकानांमध्ये गर्दी केली होती. मात्र यावेळी युरिया व डीएपी खतांची टंचाई असल्यामुळे शेतकऱ्यांना इतर पर्यायी खते खरेदी करावी लागत आहेत.

## क्राईम न्युज

### अवैध गुटखा विक्रीसाठी जवळ बाळगणाऱ्यावर गुन्हा दाखल

परंडा (प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गत समाधान, प्रदीप दोघे रा. परंडा ता. परंडा जि. धाराशिव यांनी दि.०५.०६.२०२६ रोजी आपल्या मालकीचे तीन गोडावुन मध्ये बावची चोक परंडा येथे महाराष्ट्रात शासनाचे प्रतिबंधीत केलेला गुटखा व तत्सव पदार्थ तंबाखु, पान मसाला, खर्रा मावा असा एकुण १,०१,८८,५०८ किंमतीचा माल विक्री करीता जवळ बाळगलेला अन्न सुरक्षा अधिकारी अन्न व औषध प्रशासन म.राज्य धाराशिव चे पथकास मिळून आला. यावरुन पोलीसांनी गुटखा साहित्यासह जप्त करुन नमूद व्यक्तींविरुध्द नळदुर्ग पो ठाणे येथे गुन्हा नोंदवला आहे.

### ४२०० फुट वायरची चोरी

नळदुर्ग (प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गत फिर्यादी बाळु जगन्नाथ वडजे, वय ६४ वर्षे, रा. उमरगा चिवरी ता. तुळजापूर जि. धाराशिव हे दि. ०५.०६.२०२६ रोजी लघु पाठबंधारे तलाव उमरगा चिवरी येथील फिर्यादी व अण्णाराव कदम,बाबासाहेब शिरगिरे, शिवाजी भोसले, अब्दुल इनामदार यांचे इलेक्ट्रीक ४२०० फुट वायर एकुण ८४,००० किंमतीचा माल अज्ञात व्यक्तीने चोरुन नेला. अशा मजकुराच्या फिर्यादी नामे-बाळु वडजे यांनी दि.०६.०६.२०२६ रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन नळदुर्ग पो ठाणे येथे गुन्हा नोंदवला आहे.

### मद्यपी चालकावर गुन्हा

धाराशिव (प्रतिनिधी)- ग्रामीण पोलीस ठाणे अंतर्गत अविनाश वय ४० वर्षे, रा.जहागीरदारवाडी ता. जि. धाराशिव, यश वय २१ वर्षे, रा. जहागीरदारवाडी ता जि.धाराशिव, प्रेमकुमार य ३४ वर्षे, रा. बालाजी नगर शेकापुर रोड धाराशिव हे दि.०६.०६.२०२६ रोजी आपआपल्या ताब्यातील अनुक्रमे टेम्पो क्र एमएच २५ एजे ९७२३, रिक्षा क्र एमएच २५ एके २४३४ व मोटरसायकल क्र एमएच २५ एसी ९४५९ व ही वरुन जहागीरदारवाडी डी शिवार व पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर चौक धाराशिव येथे मद्यधुंद अवस्थेत चालवून कलम-१८५ मोवाका चे उल्लंघन केले. यावरुन पोलीसांनी सरकारतर्फे दिलेल्या प्रथम खबरेवरुन नमूद व्यक्तीविरुध्द धाराशिव ग्रामीण पो ठाणे येथे स्वतंत्र ३ गुन्हे नोंदवले आहेत.

### सोन्या- चांदीच्या दागिण्याची चोरी

उमरगा (प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गत फिर्यादी अब्दुल वाहब शमशोद्दीन शेख(लदाफ), वय ३८ वर्षे, रा. डिग्गी रोड उमरगा ता.उमरगा जि. धाराशिव यांचे घराचे कुलूप अज्ञात व्यक्तीने दि.०८.०६.२०२६ रोजी तोडून आत प्रवेश करुन घरातील २४ ग्रॅम वजनाचे सोन्याचे दागिने व १२ तोळे चांदीचे दागिने असा एकुण २,७५,२५० किंमतीचा माल चोरुन नेला. दिलेल्या प्रथम खबरेवरुन उमरगा पो ठाणे येथे गुन्हा नोंदवला आहे.

## सोलर-पवनचक्कीच्या प्रकल्पाचे साहित्य चोरी करणारा स्थानिक गुन्हे शाखेच्या ताब्यात



धाराशिव (रामेश्वर डोंगरे)- धाराशिव जिल्हयातील सोलार प्लॅट व पचनचक्कीचे संबंधीत असणाऱ्या प्रकल्पातून तेथील साहित्य, वायर, चोरीस जाण्याचे प्रकार घडले होते. अशाच प्रकारचे काही गुन्हे धाराशिव गुन्हे अभिलेखावर नोंद असल्याने व सदरचे गुन्हे अतिसंवेदनशील व गंभीर स्वरूपाचे असल्याने श्रीमती रितू खोखर, पोलीस अधिक्षक, धाराशिव यांनी असे गुन्हे तात्काळ उघडकीस आणण्याबाबत स्थानिक गुन्हे शाखेचे प्रभारी अधिकारी पोनि विनोद इज्जपवार यांना आदेशित केले होते.

दि ०७.०६.२०२६ रोजी स्थानिक गुन्हे शाखेचे सपोनि कासार व पथक यांना माहिती मिळाली की, येडशी ता जि धाराशिव येथून ०२ संशयित इसमांना त्यांचे टाटा सुमो वाहनासह शिताफीने ताब्यात घेतले. ताब्यात घेतलेल्या आरोपींकडे चौकशी केली असता त्यांनी त्यांचे अन्य साथीदारांचे सोबत मिळून तेरखेडा, रुईभर, कौडगाव, ढोकी, ता धाराशिव साबळेवाडी व आरसोली ता भूम, गौरगाव व मस्सा ता कळंब या शिवारात सोलर तसेच पवनचक्की प्लांटवरील तांब्याच्या तारा असणा-या केबलची चोरी केली असल्याचे कबूल केले. ताब्यात घेतलेल्या व्यक्तीकडून एकूण १९५ किलो वजनाच्या तांब्याच्या तारा व गुन्हयात वापरलेली टाटा सुमो असा एकूण ०६,४२,४०० रूपयांचा मुददेमाल ताब्यात घेण्यात आला आहे.त्याच्याकडून चोरीचे एकूण १० गुन्हे उघडकीस आले आहेत.अटक करण्यात आलेल्या नावे शिवाजी उर्फ नाना संजय काळे रा खामकर पारधी पेढी, ता वाशी, जि धाराशिव व अन्य एक विधीसंघर्षग्रस्त बालक अशी असून नमुद आरोपी व जप्त मुददेमाल पुढील कारवाईस्तव पोस्टे धाराशिव ग्रामीण यांचे ताब्यात देण्यात आले आहे.

सदरची कामगिरी श्रीमती रितू खोखर, पोलीस अधिक्षक धाराशिव व सचिन पांडकर, अपर पोलीस अधिक्षक धाराशिव यांचे मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोनि श्री विनोद इज्जपवार, सपोनि सुदर्शन कासार, पोह शौकत पठाण, पोह प्रकाश औताडे, पोह जावेद काझी, पोह फरहान पठाण, पोकॉ १०२९ कोळी, चापोह रत्नदिप डोंगरे, नागनाथ गुरव यांचे पथकाने केली आहे. या प्रकरणी पोलिस अधिक तपास करीत आहेत.

## राष्ट्रीय बंजारा परिषदेच्या राज्याच्या उपाध्यक्षपदी विलास राठोड यांची निवड



जळकोट (विजय पिसे)- तुळजापूर तालुक्यातील आलियाबाद येथील विलास तारू राठोड यांची बंजारा समाजाची संघटना म्हणूनगणल्या जाणाऱ्या राष्ट्रीय बंजारा परिषद च्या महाराष्ट्र प्रदेश उपाध्यक्षपदी निवड करण्यात आली असून त्यांच्या या निवडीचे सर्वत्र कौतुक होत आहे .

अक्कलकोट येथील शांतिस्थळ येथे संत धावजी बापू महाराज यांच्या पुण्यस्मरण यात्रा महोत्सवानिमित्त आयोजित कार्यक्रमात ही निवड जाहीर करण्यात आली. राष्ट्रीय बंजारा परिषदेचे संस्थापक अध्यक्ष भगवंत सेवक उद्योगपती किसनभाऊ राठोड यांच्या हस्ते विलास राठोड यांना निवडीचे पत्र देण्यात आले. यावेळी पोहरादेवी धर्मपीठाचे धर्मगुरू महंत जितेंद्र महाराज,राष्ट्रीय अध्यक्ष डॉ. मोहन चव्हाण महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष उमेश राठोड, कार्याध्यक्ष संतोष राठोड, प्रभारी राजेश पवार,राष्ट्रीय सल्लागार शिवाजी राठोड, धाराशिव जिल्हा अध्यक्ष वसंत पवार, कार्याध्यक्ष किरण राठोड सह राज्य भरातील प्रमूख महंत व राष्ट्रीय बंजारा परिषदेचे पदाधिकारी उपस्थित होते.

यांच्या प्रमुख उपस्थितीत विलास राठोड यांना नियुक्तीपत्र प्रदान करण्यात आले. तसेच त्यांचा जंगी सत्कारही करण्यात आला. विलास राठोड यांनी यापूर्वी राष्ट्रीय बंजारा परिषद तुळजापूर तालुका अध्यक्ष तसेच धाराशिव जिल्हाध्यक्ष म्हणून जबाबदाऱ्या यशस्वीपणे पार पाडल्या आहेत. त्यांच्या कार्याची दखल घेत संघटनेने त्यांना थेट महाराष्ट्र प्रदेश उपाध्यक्ष पदाची महत्त्वाची जबाबदारी दिली आहे.

सामाजिक व राजकीय क्षेत्रातही त्यांनी उल्लेखनीय कामगिरी केली आहे. त्यांनी भाजपा धाराशिव जिल्हा माजी चिटणीस तसेच तुळजापूर तालुका महामंत्री म्हणूनही कार्य केले आहे. याशिवाय महाराष्ट्र शासनाच्या संत सेवालाल महाराज तांडा समृद्धी योजनेअंतर्गत धाराशिव जिल्हाधिकारी समितीवर अशासकीय सदस्य म्हणूनही ते कार्यरत आहेत. बंजारा समाजाच्या सार्वजनिक उत्सवांपासून ते आरक्षणाच्या लढ्यापर्यंत विविध सामाजिक उपक्रमांमध्ये त्यांनी सक्रिय सहभाग नोंदविला आहे.शासन , प्रशासन, खाजगी आणि सामाजिक क्षेत्रामध्ये निष्ठा, प्रामाणिकपणा, कार्यतत्परता आणि समाजहिताची जाणीव ठेवून त्यांनी केलेल्या प्रेरणादायी कार्याची दखल घेत त्यांची ही निवड करण्यात आली आहे. त्यांच्या या निवडीबद्दल धाराशिव जिल्ह्यासह राज्यभरातून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

## रहदारीस धोकादायरीत्या वाहन उभे करणाऱ्यांवर गुन्हे नोंद

धाराशिव (प्रतिनिधी)- शहर पोलीस ठाणे अंतर्गत इस्माईल रा. समर्थनगर धाराशिव यांनी दि.०६.०६.२०२६ रोजी आपल्या ताब्यातील छोटा हत्ती हा ताजमहल टॉकीज समोरील हायवे जवळ धाराशिव येथे सार्वजनिक रस्त्यावर रहदारीस धोकादायकरीत्या उभे केलेले असताना धाराशिव शहर पोलीसांना मिळून आले. यावरुन पोलीसांनी सरकारतर्फे दिलेल्या प्रथम खबरेवरुन नमूद व्यक्तीविरुध्द धाराशिव शहर पो.ठा. येथे गुन्हा नोंदवला आहे.

ओ३म् भूर्भुवः स्वः ।
तत्सवितुर्वरेण्यं भर्गो देवस्य धीमहि ।
धियो यो नः प्रचोदयात् ।।

# लातूर समाचार

## वाढलेली महागाई कमी का होत नाही!

आता तर अमेरिका व इराण दरम्यानच्या युद्धामुळे इंधनाच्या दरात वाढ होत आहे. ही वाढ टप्पा-टप्प्याने होत आहे. इंधनाचे दर वाढले की, बाजारात आपोआप महागाई वाढते हे गणित सर्वांना माहिती आहे. मुळात वीस वर्षापुर्वीचे इंधनाचे दर आजचे दरात मोठी वाढ होत गेलेली आहे. महागाई वाढत जात आहे ती कधी कमी होतील ते सांगता येत नाही. चढता आलेख पाहिला तर कधी तरी होतीई अशी केवळ आशा वाटते. तसे पाहिले तर दर कमी-अधिक होत असतात. कमी झाल्यास दर कमी होणे अपेक्षित असते. ज्या बाबी किंवा वस्तू जागतिक स्तरावरील असतात त्याचे दर जागतिक स्तरावर कमी अधिक होत असतात. इंधनाचे दर कमी-अधिक होत असले तरी नागरिकांना चढ्या दराने मिळते. असे का होते. यावर कोणाचा अंकुश नाही का? लक्ष नाही का? असे विचार येतात. महागाई कधी तरी दिलासादायक असू शकते का? ती असू शकत नाही कारण यावर नियंत्रण नाही. कोणीही कोणत्याही दरात जनतेला लुटावे असा प्रकार होतो हे दुःखाने म्हणावे लागते. मुळात एखाद्या वस्तूचे दर कसे ठरविले जातात. यात काही तथ्य असते का? किंवा मनाला येईल दर ठरविले जातात का? याचा उलगडा अद्याप झालेला नाही. आपणच आपल्या व्यक्तीकडून किती किंमत घ्यावी याचा विचार होत नाही. ज्यावेळी उत्पादन खर्च व त्यावर होणारा प्रसिद्धिचा खर्च, त्यावर किती प्रमाणात नफा घ्यावा यावर किंमती ठरत होत्या. आता तसे दिसून येत नाही. एखादी वस्तू बनविण्याची झाली तर पुर्वी पुर्ण हिशोब केला जात होता व कमीत कमी दर ठरविला जात होता. आता तर कितीही किंमत आकारली जाताना दिसून येते, कितीही नफा कमाविला जातो. मुळात यावर कसलेही नियंत्रण दिसून येत नाही. वास्तविक वाटेल तेवढी किंमत आकारून जनतेकडून घेतली जाते. वास्तविक हा ज्यांचा त्यांचा अधिकार आहे. या बाबत कोणी अक्षेपही घेवू शकत नाही. त्यामुळे बाजारात भरसाठ महागाई वाढली आहे. त्यात युद्धामुळे भर पडली आहे. गॅसच्या दरात हळू-हळू वाढच झाली आहे. महागाईवर मात करण्यासाठी कोणता मार्ग आवलंबा ही एक चिंता सतावत आहे. बाजारात मोठ्या प्रमाणात महागाई वाढल्याने श्रीमंताला चिंता नाही मात्र गोरगरीबांना दररोजचे जीवन जगणे कठिण झाले आहे. जीवनाश्यक वस्तूच्या दरात वाढ होत आहे. किमान सरकारने ज्या जीवनाश्यक बाबी आहेत त्यावर तरी नियंत्रण ठेवावे. असेच चालत राहीले तर एक दिवस उद्रेक होण्याची शक्यता नाकारता येत नाही. नियंत्रण नावाचा प्रकार लोप पावत आहे. ज्यांची सध्याला सतत नावे घेतली जातात. तेच सराकार चालवित आहेत का? त्यांनाच सरकार मदत करते, त्यांनाच कामे देते ते काही चुकीचे वाटत नाही. मर्यादा ओलांडून दर आकारले जात आहेत. एक तर शुद्धतेबाबत प्रश्नचिन्ह आहे. बाकी जे काही मिळते त्याचे दर गगणाला भिडले आहेत. दररोज कमावणाऱ्यांना जीवन जगणे कठिण आहे. दररोज हाताला काम मिळेल असे ही होत नाही. एक दिवस काम मिळाले तर दोन-तीन दिवस मिळत नाही. ही वस्तूस्थिती आहे. दुसरे असे की, दोन किंवा चार चाकी गाड्याबाबत नाही तर जे जीवनाश्यक आहेत त्या बाबी स्वस्त असल्या पाहिजेत. जेवढयाला मिळते त्यावर माफक नफा आकारला पाहिजे. माजी मंत्री दिवंगत श्रीकांत जिचकार यांनी उदा. दिले. ते म्हणाले, एक वस्तू बनविण्यासाठी वीस हजार लागतात, मुळ किंमत वीस रूपये असताना ती जर बाजारात चाळीस हाजारात विकत असाल तर याला जबाबदार कोणाला धरावयाचे. असे मत व्यक्त केले होते, काही जण म्हणतील घ्यायचे तर घ्या नसता नको. मुळात आज मिळालेली मजुरी बरोबर खर्च हे गणित लागले पाहिजे. मिळणारी कमाई महिण्याला तीस हजार व जीवनाश्यक वस्तू खरेदी म्हणा किंवा घरखर्च चाळीस हजार येत असेल तर दहा हजार कोठून उपलब्ध करायाचे? जे सरकारी कामात आहेत ते वरकमाई करतील. जे दररोज काम करून खाणाऱ्यांनी काय करावे? हा चिंतेचा विषय आहे. आज जरी या बाबीकडे दुर्लक्ष केले तरी आगामी काळात झुरळाचा फैलाव होवू शकते. हे लक्षात घेतले पाहिजे. सध्याला जगणे कठिण होत आहे. युद्धामुळे तर अधिक कठिण झाले आहे. महागाई वाढली तर युद्धामुळे! महागाईस कारण युद्ध हे सर्वांना सापडले आहे. यावर मात करण्यासाठी कमी नफाखोरी करावी. सरकारने कमी कर लावावा. कमी नफा जनतेकडून उकळावा. नेत्यांनी आपली पेन्शन, मानधन अर्धे सरकार दरबारी जमा करावे. कारण जनसेवक किंवा लोकप्रतिनिधी म्हणून समाजात वावरता व समाजाच्या जीवावर लोकप्रतिनिधी, समाजसेवक होतात त्यावेळी जनतेवर आर्थिक संकट आल्यावर काही प्रमाणात त्यागही केला पाहिजे. बाराही महीणे आपलाचा विचार करणे योग्य नाही. युद्धाच्या कारणावरून महागाई वाढत असताना यावर सरकारचे लक्ष दिले पाहिजे. निकृष्ठ दर्जेचा मालाची किंमत उत्कृष्ठ मालासारखे घेत असला तर ते योग्य नाही. मुळात उत्पादन खर्चावर दर असणे अपेक्षित आहेत. यावर गंभीर विचार केला पाहिजे. तो केला जात नाही. कोणीही ठराविक मोठ्या प्रमाणात जनतेची लुट करीत आहे. ते योग्य नाही. मोफत द्या असे म्हणणे नाही तर वाजवी किंमतीत वस्तू मिळाल्या पाहिजेत. महागाई वाढत आहे ती कमी होण्याचे नाव घेत नाही हे चक्र योग्य नाही. यावर सरकारने काही तरी ठोस उपायोजना केली पाहिजे. नसता दरवर्षी नवीन वर्ष येते तसे दरवर्षी महागाईत वाढ होत आहे हे दुष्टचक्र समाज व्यवस्थेसाठी घातक आहे. वास्तविक यावर उपयोजना असू शकते मात्र ती कशी व कोणत्यावेळी वापरायाची या बाबत धाडसी निर्णय होत नाहीत. सरकारने सर्वच बाबीवर नियंत्रण आणावे असे नाही. चैनीच्या, सुखसोयीच्या दरनियंत्रणात नाही आणले तरी चालेल. दारूच्या म्हणजे मद्य, लिकरच्या मोठी वाढ केली तरी कोणाचेही तक्रार नाही, मोर्चे-आंदोलने निघाले नाहीत. त्यामुळे जीवनाश्यकवस्तूच्या दरात वाढ किंवा महागाई वाढली की, गोरगरीब जनसामान्यांना आर्थिक त्रास होतो. जीवन जगणे कठिण होतो ही वस्तूस्थिती आहे. त्यामुळे सरकारने कठोरातील कठोर महागाईवर नियंत्रण ठेवावे. या बाबत गांर्भीयाने विचार करावा. नसता काय होईल महागाई वाढत जाईल मोठा उद्रेक झाला तर सांभाळणे आवघड होवून भारतात विपरीत घडू शकेल!

# नेत्रदान : प्रकाशाचा अमूल्य वारसा



मानवी शरीरातील प्रत्येक अवयव महत्त्वाचा असला तरी डोळ्यांचे स्थान सर्वाधिक अनन्यसाधारण आहे. डोळे हे केवळ शरीराचा एक अवयव नसून ते ज्ञान, अनुभव, सौंदर्य आणि जगाशी संवाद साधण्याचे माध्यम आहेत. या डोळ्यांमुळेच माणूस निसर्गातील विविध रंग अनुभवतो, आपल्या प्रिय व्यक्तींचे चेहरे पाहतो, शिक्षण घेतो, काम करतो आणि जीवनातील असंख्य आनंदाचे क्षण अनुभवतो. दृष्टी ही मानवाला लाभलेली एक अनमोल देणगी आहे. ज्यांच्या डोळ्यांतून जगाचे दर्शन घडते, त्यांना दृष्टीचे महत्त्व कदाचित नेहमी जाणवत नाही; परंतु ज्यांनी दृष्टी गमावली आहे किंवा ज्यांना जन्मतःच अंधत्व लाभले आहे, त्यांच्यासाठी दृष्टी म्हणजे संपूर्ण आयुष्य बदलून टाकणारी शक्ती असते. अशा लाखो अंध आणि दृष्टीदोषग्रस्त व्यक्तींच्या जीवनात प्रकाश आणण्याची क्षमता नेत्रदानामध्ये आहे. म्हणूनच दरवर्षी १० जून रोजी जागतिक नेत्रदान दिन साजरा केला जातो. हा दिवस केवळ जनजागृतीचा कार्यक्रम नसून मानवतेचा, सामाजिक जबाबदारीचा आणि परोपकाराचा संदेश देणारा महत्त्वपूर्ण दिवस आहे.

नेत्रदान म्हणजे मृत्यूनंतर एखाद्या व्यक्तीच्या डोळ्यांतील कॉर्निया किंवा नेत्रपटल दान करणे. कॉर्निया हा डोळ्याचा सर्वात बाहेरील पारदर्शक भाग असून तो प्रकाश डोळ्याच्या आत पोहोचवण्याचे काम करतो. कॉर्नियामध्ये दोष निर्माण झाल्यास व्यक्तीला अंशतः किंवा पूर्ण अंधत्व येऊ शकते. आधुनिक वैद्यकीय विज्ञानामुळे अशा रुग्णांवर कॉर्निया प्रत्यारोपणाची शस्त्रक्रिया करून त्यांची दृष्टी पुन्हा मिळवून देता येते. मृत्यूनंतर दान केलेल्या एका व्यक्तीच्या दोन्ही डोळ्यांमधील कॉर्निया दोन वेगवेगळ्या व्यक्तींना उपयोगी पडू शकतात. त्यामुळे एका व्यक्तीच्या नेत्रदानातून दोन अंध व्यक्तींच्या जीवनात प्रकाश निर्माण होऊ शकतो. म्हणूनच नेत्रदानाला महादान असेही म्हटले जाते.

दृष्टी ही व्यक्तीच्या जीवनमानाशी थेट संबंधित असते. एखादी व्यक्ती दृष्टी गमावते तेव्हा तिच्या जीवनातील अनेक शक्यता मर्यादित होतात. शिक्षण, रोजगार, प्रवास, सामाजिक संबंध आणि दैनंदिन जीवनातील अनेक कामे कठीण बनतात. अंधत्वामुळे व्यक्तीला मानसिक, सामाजिक आणि आर्थिक समस्यांनाही सामोरे जावे लागते. अनेकदा कुटुंबातील इतर सदस्यांवरही त्याचा परिणाम होतो. अशा परिस्थितीत नेत्रदानाद्वारे मिळालेली दृष्टी केवळ एका व्यक्तीच्या डोळ्यांमध्ये प्रकाश आणत नाही, तर त्याच्या संपूर्ण जीवनात आशेची नवी पहाट निर्माण करते. त्यामुळे नेत्रदान हे केवळ वैद्यकीय प्रक्रिया नसून मानवतेचे श्रेष्ठ उदाहरण आहे.

जगभरात अंधत्व ही एक गंभीर आरोग्य समस्या मानली जाते. विविध आंतरराष्ट्रीय अभ्यासांनुसार कोट्यवधी लोक काही ना काही प्रकारच्या दृष्टीदोषाने ग्रस्त आहेत. त्यापैकी लाखो लोक कॉर्नियाच्या आजारांमुळे अंधत्व अनुभवत आहेत. अनेकांना कॉर्निया प्रत्यारोपणाची गरज असते; परंतु दानासाठी उपलब्ध होणाऱ्या कॉर्नियांची संख्या अत्यल्प असल्यामुळे हजारो रुग्ण प्रतीक्षा यादीत राहतात. भारतामध्येही ही समस्या मोठ्या प्रमाणावर आहे. लोकसंख्येच्या प्रमाणात अंधत्व आणि दृष्टीदोषाचे प्रमाण मोठे असून कॉर्नियाच्या अंधत्वामुळे अनेक व्यक्तींचे जीवन प्रभावित झाले आहे. देशभरात दरवर्षी लाखो कॉर्नियांची आवश्यकता असताना प्रत्यक्षात उपलब्ध होणाऱ्या नेत्रांची संख्या त्यापेक्षा खूपच कमी आहे. ही तफावत दूर करण्यासाठी व्यापक जनजागृतीची आवश्यकता आहे.

भारतातील नेत्रदान चळवळीचा इतिहास प्रेरणादायी आहे. विसाव्या शतकाच्या मध्यापासून नेत्रदान आणि कॉर्निया प्रत्यारोपणाच्या क्षेत्रात महत्त्वपूर्ण प्रगती झाली. विविध वैद्यकीय संस्था, नेत्ररोगतज्ज्ञ, सामाजिक कार्यकर्ते आणि स्वयंसेवी संस्थांनी नेत्रदानाविषयी जागरूकता निर्माण करण्यासाठी सातत्याने प्रयत्न केले. देशातील अनेक शहरांमध्ये आय बँकांची स्थापना करण्यात आली. आय बँक म्हणजे नेत्रदानातून प्राप्त झालेले कॉर्निया सुरक्षित ठेवण्याची, त्यांची तपासणी करण्याची आणि योग्य रुग्णांना उपलब्ध करून देण्याची व्यवस्था होय. या संस्थांमुळे नेत्रदान आणि प्रत्यारोपण प्रक्रिया अधिक प्रभावी बनली आहे. तरीही लोकसंख्येच्या तुलनेत नेत्रदानाचे प्रमाण वाढविण्याची गरज कायम आहे.

नेत्रदानाच्या संदर्भात सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे ते मृत्यूनंतर केले जाते. जिवंत असताना व्यक्तीला कोणतीही शारीरिक हानी न होता ती नेत्रदानाचा संकल्प करू शकते. व्यक्तीच्या मृत्यूनंतर साधारणपणे चार ते सहा तासांच्या आत प्रशिक्षित वैद्यकीय पथक कॉर्निया संकलित करते. ही प्रक्रिया अत्यंत काळजीपूर्वक आणि सन्मानपूर्वक केली जाते. मृतदेहाचे विद्रूपीकरण होत नाही, चेहऱ्याच्या स्वरूपात कोणताही बदल होत नाही आणि अंत्यदर्शन किंवा धार्मिक विधींमध्ये कोणताही अडथळा निर्माण होत नाही. त्यामुळे नेत्रदानाबाबत असलेली भीती किंवा गैरसमज दूर करणे आवश्यक आहे.

समाजामध्ये नेत्रदानासंदर्भात अनेक गैरसमज आजही आढळतात. काही लोकांना वाटते की नेत्रदान केल्याने पुढील जन्मात अंधत्व येऊ शकते. काहींना असे वाटते की मृतदेहाचा अपमान होतो किंवा धार्मिक परंपरांचा भंग होतो. काही लोकांना नेत्र काढण्याच्या प्रक्रियेची भीती वाटते. प्रत्यक्षात या सर्व समजुती निराधार आहेत. जगातील प्रमुख धर्म मानवसेवा, परोपकार आणि दान यांना सर्वोच्च स्थान देतात. कोणताही धर्म नेत्रदानाला विरोध करत नाही. उलट दुसऱ्याला दृष्टीदान देणे हे अत्यंत पुण्याचे कार्य मानले जाते. त्यामुळे धार्मिक किंवा सांस्कृतिक कारणांमुळे नेत्रदान टाळण्याचे कोणतेही कारण नाही.

भारतीय संस्कृतीमध्ये दानधर्माला अत्यंत महत्त्वाचे स्थान आहे. अन्नदान, वस्त्रदान, विद्यादान, रक्तदान यांसारख्या अनेक दानपरंपरा आपल्या समाजात प्राचीन काळापासून अस्तित्वात आहेत. नेत्रदान ही या दानपरंपरेची आधुनिक आणि अत्यंत प्रभावी अभिव्यक्ती आहे. मृत्यूनंतरही दुसऱ्याच्या जीवनात प्रकाश निर्माण करण्याची क्षमता या दानामध्ये आहे. त्यामुळे नेत्रदान ही केवळ वैद्यकीय गरज नसून सामाजिक आणि नैतिक जबाबदारीदेखील आहे.

अंधत्वाचा परिणाम केवळ व्यक्तीपुरता मर्यादित राहत नाही. कुटुंबातील इतर सदस्यांनाही त्याचा मोठा फटका बसतो. अंध व्यक्तीला दैनंदिन कामांसाठी इतरांवर अवलंबून राहावे लागते. शिक्षण, रोजगार आणि सामाजिक सहभागाच्या संधी कमी होतात. काही वेळा कुटुंबातील एखाद्या सदस्याला त्याची काळजी घेण्यासाठी स्वतःच्या करिअरमध्ये तडजोड करावी लागते. अशा परिस्थितीत जर त्या व्यक्तीला कॉर्निया प्रत्यारोपणाद्वारे दृष्टी मिळाली तर संपूर्ण कुटुंबाचे जीवन बदलू शकते. त्यामुळे नेत्रदानाचा लाभ केवळ एका व्यक्तीला नाही तर संपूर्ण समाजाला मिळतो.

विशेषतः बालकांमध्ये नेत्रदानाचे महत्त्व अधिक आहे. लहान वयात कॉर्नियाशी संबंधित अंधत्व आल्यास मुलांच्या शारीरिक, मानसिक आणि शैक्षणिक विकासावर गंभीर परिणाम होतो. दृष्टीअभावी त्यांना शिक्षण घेणे, खेळणे आणि सामाजिक कौशल्ये विकसित करणे कठीण जाते. योग्य वेळी कॉर्निया प्रत्यारोपण झाल्यास अशा मुलांचे जीवन पूर्णपणे बदलू शकते. ते इतर मुलांप्रमाणे शिक्षण घेऊ शकतात, करिअर घडवू शकतात आणि समाजात स्वाभिमानाने जगू शकतात. म्हणूनच नेत्रदान हे भविष्य घडविणारे दान मानले जाते.

जागतिक नेत्रदान दिनाचे मुख्य उद्दिष्ट म्हणजे समाजामध्ये नेत्रदानाबाबत जागरूकता निर्माण करणे. अनेक लोकांना नेत्रदानाची प्रक्रिया, त्याचे फायदे आणि त्यामागील वैज्ञानिक सत्य यांची माहिती नसते. त्यामुळे विविध शासकीय संस्था, आरोग्य विभाग, वैद्यकीय महाविद्यालये आणि स्वयंसेवी संस्था या दिवशी विविध कार्यक्रमांचे आयोजन करतात. जनजागृती रॅली, व्याख्याने, चर्चासत्रे, नेत्रतपासणी शिबिरे, निबंध स्पर्धा आणि सामाजिक माध्यमांवरील मोहिमा यांद्वारे लोकांपर्यंत संदेश पोहोचविला जातो. या उपक्रमांमुळे समाजामध्ये सकारात्मक दृष्टिकोन निर्माण होण्यास मदत होते.

ग्रामीण भारतामध्ये नेत्रदानाविषयी जागरूकतेचा अभाव तुलनेने अधिक आहे. अनेक गावांमध्ये आय बँकांची माहिती उपलब्ध नसते. काही ठिकाणी अंधश्रद्धा आणि गैरसमज अधिक प्रमाणात आढळतात. त्यामुळे ग्रामीण भागात विशेष मोहिमा राबविण्याची गरज आहे. आशा सेविका, अंगणवाडी कार्यकर्त्या, ग्रामपंचायत सदस्य, शिक्षक आणि स्थानिक स्वयंसेवी संस्था यांच्या माध्यमातून जनजागृती वाढविता येऊ शकते. ग्रामीण समाजामध्ये विश्वासार्ह स्थान असलेल्या व्यक्तींनी नेत्रदानाचा प्रचार केल्यास त्याचा अधिक परिणाम होऊ शकतो.

शिक्षण क्षेत्राची भूमिकाही या संदर्भात अत्यंत महत्त्वाची आहे. शाळा आणि महाविद्यालयांमध्ये विद्यार्थ्यांना नेत्रदानाविषयी माहिती देणे आवश्यक आहे. युवक वर्ग हा समाजातील परिवर्तनाचा प्रमुख घटक आहे. जर तरुण पिढीने नेत्रदानाचा स्वीकार केला, तर भविष्यात नेत्रदानाचे प्रमाण लक्षणीयरीत्या वाढू शकते. विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन विकसित करून अंधश्रद्धा दूर करण्याचे काम शिक्षण संस्थांमार्फत प्रभावीपणे करता येते.

प्रसारमाध्यमे ही जनजागृतीची प्रभावी साधने आहेत. वृत्तपत्रे, दूरदर्शन, रेडिओ आणि डिजिटल माध्यमांद्वारे नेत्रदानाविषयी माहिती व्यापक प्रमाणात पोहोचविता येते. यशस्वी कॉर्निया प्रत्यारोपण झालेल्या व्यक्तींच्या कथा समाजापर्यंत पोहोचवल्यास लोकांमध्ये प्रेरणा निर्माण होते. एखाद्या व्यक्तीने पुन्हा आपल्या आई-वडिलांचा चेहरा पाहिला, आपल्या मुलांना पाहिले किंवा अनेक वर्षांनंतर निसर्गाचा अनुभव घेतला, अशा कथा लोकांच्या मनाला स्पर्श करतात आणि नेत्रदानाबाबत सकारात्मक विचार निर्माण करतात

वैद्यकीय क्षेत्रातील प्रगतीमुळे आज कॉर्निया प्रत्यारोपणाची यशस्वीता मोठ्या प्रमाणात वाढली आहे. अत्याधुनिक शस्त्रक्रिया तंत्रज्ञान, सुधारित जतन पद्धती आणि प्रशिक्षित तज्ज्ञांमुळे अनेक रुग्णांना उत्तम परिणाम मिळत आहेत. त्यामुळे नेत्रदानातून मिळणाऱ्या लाभांची व्याप्ती अधिक वाढली आहे. भविष्यात जैवतंत्रज्ञान आणि संशोधनामुळे या क्षेत्रात आणखी प्रगती होण्याची अपेक्षा आहे. तथापि, कोणतेही तंत्रज्ञान उपलब्ध असले तरी दानासाठी आवश्यक कॉर्निया मिळाले नाहीत तर प्रत्यारोपण शक्य होणार नाही. म्हणूनच नेत्रदानाची गरज कायम महत्त्वाची राहणार आहे.

नेत्रदानाचा निर्णय वैयक्तिक असला तरी त्याची अंमलबजावणी कुटुंबाच्या सहकार्यावर अवलंबून असते. अनेक वेळा व्यक्तीने नेत्रदानाचा संकल्प केलेला असतो; परंतु मृत्यूनंतर कुटुंबीयांना त्याची माहिती नसल्यामुळे दान होऊ शकत नाही. त्यामुळे प्रत्येकाने आपल्या कुटुंबीयांशी या विषयावर चर्चा करणे आवश्यक आहे. मृत्यूनंतर आपले नेत्र दान करण्याची इच्छा स्पष्टपणे व्यक्त करणे गरजेचे आहे. अशा संवादामुळे कुटुंबीयही या निर्णयाचा सन्मान करण्यास तयार होतात.

समाजातील प्रसिद्ध व्यक्तींची भूमिका देखील महत्त्वाची आहे. कलाकार, साहित्यिक, क्रीडापटू, सामाजिक कार्यकर्ते आणि धार्मिक नेते यांनी नेत्रदानाचा संदेश दिल्यास त्याचा व्यापक प्रभाव पडतो. अनेक लोक आपल्या आदर्श व्यक्तींचे अनुकरण करतात. त्यामुळे सार्वजनिक जीवनातील व्यक्तींनी नेत्रदानाविषयी खुलेपणाने भूमिका मांडणे आवश्यक आहे. त्यांच्या सहभागामुळे जनजागृती मोहिमांना अधिक बळ मिळू शकते.

नेत्रदान आणि मानवता यांचा अतूट संबंध आहे. माणूस आपल्या आयुष्यात अनेक प्रकारे समाजासाठी योगदान देतो; परंतु मृत्यूनंतरही समाजाच्या सेवेसाठी काहीतरी देऊन जाण्याची संधी फार कमी क्षेत्रांमध्ये उपलब्ध असते. नेत्रदान ही अशीच एक संधी आहे. जीवनाचा शेवट हा दुसऱ्या कोणाच्या नव्या सुरुवातीचे कारण ठरू शकतो. एखाद्या व्यक्तीच्या मृत्यूनंतर तिचे नेत्र दोन अंध व्यक्तींना प्रकाश देऊ शकतात, ही कल्पनाच किती प्रेरणादायी आहे.

आजच्या काळात नेत्रदानाबाबतची माहिती मिळविणे आणि नोंदणी करणेही सोपे झाले आहे. विविध शासकीय आणि स्वयंसेवी संस्थांमार्फत नोंदणीची सुविधा उपलब्ध आहे. तथापि, केवळ नोंदणी करून थांबणे पुरेसे नाही. समाजामध्ये या विषयावर संवाद वाढविणे, इतरांना प्रेरित करणे आणि नेत्रदानाच्या चळवळीला लोकचळवळीचे स्वरूप देणे आवश्यक आहे. प्रत्येक व्यक्ती, प्रत्येक कुटुंब आणि प्रत्येक संस्था या कार्यात सहभागी झाली तर अंधत्वाविरुद्धची लढाई अधिक प्रभावी ठरू शकते.

जागतिक नेत्रदान दिन हा आपल्याला आपल्या सामाजिक जबाबदाऱ्यांची जाणीव करून देणारा दिवस आहे. दृष्टी ही जीवनातील अमूल्य संपत्ती आहे आणि ती दुसऱ्याला देण्याची संधी नेत्रदानामध्ये आहे. आपण जिवंत असताना समाजासाठी जे काही करतो, त्यापलीकडे जाऊन मृत्यूनंतरही दुसऱ्याच्या आयुष्यात प्रकाश निर्माण करण्याची ताकद या दानामध्ये आहे. त्यामुळे नेत्रदान ही केवळ वैद्यकीय प्रक्रिया नाही, तर ती मानवतेचा उत्सव आहे.मानवजातीच्या इतिहासात दान, त्याग आणि परोपकार यांना नेहमीच सर्वोच्च स्थान मिळाले आहे. नेत्रदान ही त्या परंपरेची आधुनिक अभिव्यक्ती आहे. एखाद्या अंध व्यक्तीच्या डोळ्यांत पुन्हा प्रकाश निर्माण करणे, त्याला स्वप्ने पाहण्याची आणि ती पूर्ण करण्याची संधी देणे यापेक्षा मोठी मानवसेवा कोणती असू शकते? म्हणूनच प्रत्येकाने नेत्रदानाचा गांभीर्याने विचार करावा. आपल्या कुटुंबीयांशी याबाबत चर्चा करावी आणि समाजामध्येही या विषयाची जागरूकता वाढवावी.

अखेरीस असे म्हणता येईल की, नेत्रदान म्हणजे मृत्यूनंतरही जिवंत राहण्याचा एक सुंदर मार्ग आहे. शरीर नश्वर असले तरी आपल्या नेत्रांमधून निर्माण झालेला प्रकाश अनेक वर्षे दुसऱ्यांच्या आयुष्यात झळकत राहू शकतो. अंधाराने वेढलेल्या एखाद्या जीवनात आशेचा किरण निर्माण करणे, हीच नेत्रदानाची खरी ताकद आहे. जागतिक नेत्रदान दिनानिमित्त आपण सर्वांनी एक संकल्प करूया की दृष्टीचा हा अमूल्य वारसा पुढील पिढ्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी आणि अंधत्वमुक्त समाज घडविण्यासाठी नेत्रदानाचा संदेश प्रत्येक घरापर्यंत नेऊया. कारण मृत्यूनंतरही जर आपले डोळे कोणाच्या आयुष्यात प्रकाश निर्माण करणार असतील, तर त्यापेक्षा मोठे दान आणि त्यापेक्षा मोठी मानवसेवा दुसरी कोणतीच असू शकत नाही.

– डॉ. राजेंद्र बगाटे

## नव्या पिढीत वाढत आहे डिजिटल थकवा; ४७% पालक, ३०% मुले साधे फोन वापरू लागले

एक काळ असा होता, जेव्हा लोकांमध्ये, विशेषतः तरुण पिढीमध्ये डिजिटल साधने आणि सोशल मीडिया स्वीकारण्याची स्पर्धा लागली होती. पण आता चित्र बदलत आहे. डिजिटल साधने, जास्त स्क्रीन टाइम आणि ऑनलाइन राहिल्यामुळे लोकांमध्ये डिजिटल थकवा वाढू लागला आहे.

भारत-अमेरिकेसह अनेक देशांमध्ये झालेल्या वेगवेगळ्या सर्वेक्षणानुसार, नवीन पिढी सततच्या नोटिफिकेशन्स, सोशल मीडिया आणि डिजिटल थकव्यापासून वाचण्यासाठी 'डिजिटल मिनिमलिझम'चा अवलंब करत आहे. काही लोक विनाइल रेकॉर्ड, सीडी आणि रेकॉर्ड प्लेयर खरेदी करत आहेत. काही लोक २००० च्या दशकातील जुनी वस्तू मानले जाणारे फ्लिप फोन किंवा कीपॅड असलेले फीचर फोन वापरत आहेत.

अनेक बॉलिवूड आणि हॉलिवूड सेलिब्रिटी वेळोवेळी डिजिटल डिटॉक्स घेतात. काही सेलिब्रिटींनी तर सोशल मीडिया अकाउंट्सही सोडून दिली आहेत. अनेक देशांच्या सरकारांनी विद्यार्थ्यांसाठी स्क्रीन टाइम मर्यादित करण्याचे नियम बनवले आहेत. भारतातही असे उपक्रम राबवले जात आहेत. कर्नाटकने विद्यार्थ्यांसाठी मनोरंजनाशी संबंधित स्क्रीन टाइम दररोज एक तासापर्यंत मर्यादित ठेवण्याचा प्रस्ताव ठेवला आहे. तर चंदीगडमध्ये 'संडे अनप्लग टू रिकनेक्ट' अभियान सुरू करण्यात आले आहे.

### महत्त्वाच्या क्षणांमध्ये डिजिटल साधनांपासून दूर राहणे कुटुंबांना जोडण्यासाठी प्रभावी

- ९१% मुलांच्या मते, फोन दूर ठेवल्यास कुटुंबातील आपापसातील संवाद सोपा होतो.
- ८७% मुले फोन-मुक्त जेवणाच्या वेळी मोकळेपणाने बोलण्यात अधिक सहजता अनुभवतात.
- ८१% पालक म्हणतात की, फोनशिवाय मुलांसोबत त्यांचे नाते अधिक मजबूत वाटते.
- ४७% पालक आणि ३०% मुले साधे फोन वापरत आहेत.
- ५४% पालक आणि ४९% मुले स्क्रीन वेळ कमी करण्याचा प्रयत्न करत आहेत.
- ५१% पालक आणि ४१% मुले काही तासांसाठी सोशल मीडिया ब्लॉक करतात.
- ४९% पालक आणि ५०% मुले अनावश्यक नोटिफिकेशन बंद करत आहेत.
- ५९% पालक आणि ४७% मुलांनी सांगितले की, डिजिटल वर्तनावर अधिक नियंत्रण आले आहे.

विवो-सीएमआर स्विच ऑफ स्टडी २०२५ – विवो इंडिया आणि सीएमआरद्वारे दरवर्षी केल्या जाणाऱ्या स्विच ऑफ अभ्यासाच्या ताज्या आकडेवारीनुसार लोक डिजिटल साधनांपासून दूर राहू लागले आहेत. विवो इंडियाचे कॉर्पोरेट कम्युनिकेशन अधिकारी, गीताज चन्नाना म्हणतात, 'स्विच ऑफ अभ्यासाचे निष्कर्ष सांगतात की, कुटुंबे महत्त्वाच्या क्षणांमध्ये डिजिटल डिस्कनेक्टचा पर्याय निवडत आहेत.'

फोन-मोबाइल नसलेल्या पर्यटनाचा उदय-ट्रॅव्हल इंडस्ट्रीमध्ये ऑफ-ग्रिड प्रवास वेगाने लोकप्रिय होत आहे. पोलारिस मार्केट रिसर्चनुसार, डिजिटल डिटॉक्स हॉलिडेची जागतिक बाजारपेठ ६ लाख कोटी रुपयांपेक्षा जास्त आहे. ही २०३४ पर्यंत वार्षिक २४.५% दराने वाढून सुमारे ४४ लाख कोटी रुपयांची होऊ शकते. ट्रॅव्हल ई-सिम प सेलीच्या सर्वेक्षणानुसार, एक चतुर्थांश प्रौढ आता फोन किंवा इंटरनेटशिवाय प्रवास करणे पसंत करत आहेत.

व्यवसायाच्या नवीन संधी शोधणाऱ्या कंपन्या– डिजिटल डिटॉक्स एक नवीन जीवनशैली आणि मोठी व्यावसायिक संधी म्हणून उदयास येत आहे. डंब.को, डंबफोन्स इंडिया आणि किकबॅक यांसारख्या कंपन्या याच मागणीवर आधारित व्यवसाय तयार करत आहेत. त्या जुने सीडी प्लेयर आणि फीचर फोन विकत आहेत. या फोनमध्ये कॉल, मेसेज, व्हॉट्सप, यूपीआय आणि मॅप यांसारख्या सुविधा असतात, पण सोशल मीडिया नसतो.

उद्योग समूहही डिजिटल डिटॉक्स रिट्रीट आयोजित करत आहेत-डिटॉक्स ट्रॅव्हल उपलब्ध करून देणाऱ्या बेंगळुरू येथील 'ट्रान्सफॉर्मिंग ट्रॅव्हल्स'च्या संस्थापक चांदनी अग्रवाल सांगतात, 'आम्हाला कॉर्पोरेट समूहांकडून त्यांच्या टीमसाठी डिजिटल डिटॉक्स रिट्रीट आयोजित करण्याची मागणी मिळते. यात लोक त्यांचे मोबाइल फोन, लॅपटॉप आणि सोशल मीडियापासून दूर राहतात. रिट्रीटमध्ये सहभागी होणारे बहुतेक लोक ३० ते ६० वयोगटातील असतात. यापैकी सुमारे ७०-८०% महिला असतात. ९०% ग्राहक लडाख, हिमाचल प्रदेश, उत्तराखंड आणि स्पीती व्हॅलीसारख्या प्रदेशात रिट्रीट आयोजित करण्यास प्राधान्य देतात.

## चक्कर येणे फक्त अशक्तपणाचे लक्षण नाही, हे या समस्येचे कारण देखील असू शकते

जेव्हा न चालताही जग फिरू लागते, तेव्हा समजा की हा केवळ थकवा नाही, तर शरीरातील असंतुलन आहे. याचे कारण काय आहे आणि ते मुळापासून कसे दूर करता येते, ते जाणून घ्या.

अनेकदा लोक चक्कर येणे, डोके फिरणे किंवा शरीरात अस्थिरता जाणवणे याला एकच गोष्ट समजतात, पण यात सूक्ष्म फरक असतो. चालताना संतुलन गमावणे हे मेंदू किंवा नसांमधील बिघाडाचे लक्षण असू शकते, तर बहुतेक प्रकरणांमध्ये चक्कर येण्याचा संबंध कानाशी असतो, जो शरीराचे संतुलन नियंत्रित करतो. म्हणून, जर तुम्हाला चक्कर येणे, मळमळ/उलटी, कमी ऐकू येणे, संतुलन राखण्यात समस्या, मोशन सिकनेस, डोकेदुखी, टिनिटस किंवा कानात शिट्टी वाजल्यासारखा आवाज येणे आणि कानात भरलेपणा किंवा जडपणा जाणवणे यांसारख्या समस्या येत असतील, तर हे वर्टिगो असण्याची शक्यता आहे

वर्टिगो हा स्वतः कोणताही आजार नाही, होय, याला शरीरात लपलेल्या एखाद्या समस्येचे लक्षण म्हटले जाऊ शकते. तो विकसित होण्यामागे मुख्य कारणे ही आहेत–

कॅल्शियम स्फटिकांचे सरकणे... कानामध्ये अत्यंत लहान कॅल्शियम कार्बोनेटचे स्फटिक असतात. जेव्हा हे स्फटिक आपल्या जागेवरून सरकून अर्धवर्तुळाकार नलिकेत (सेमिसर्कुलर कॅनाल) जातात, तेव्हा मेंदूला शरीर फिरत असल्याचा चुकीचा संकेत मिळतो. याला बीपीपीव्ही म्हणतात. यामागे डोक्याला झालेली जुनी दुखापत, कानाचे ऑपरेशन किंवा वाढत्या वयानुसार कानाच्या आत होणारे बदल जबाबदार असू शकतात. वयानुसार हे स्फटिक सैल होतात. तसेच, वृद्धांमध्ये दृष्टी कमी होणे, सांध्यांमध्ये ढिलेपणा आणि स्नायूंची ताकद कमी होणे यामुळे संतुलन राखणे कठीण होते.

औषधांचा परिणाम जर कोणी रक्तदाब, हृदयविकार, मधुमेह आणि झोपेची औषधे एकाच वेळी घेत असेल, तर या औषधांच्या परस्पर क्रियेमुळे किंवा दुष्परिणामांमुळे असंतुलन आणि चक्कर येण्याची समस्या निर्माण होऊ शकते.

संक्रमण आणि इतर रोग... मेनिअर्स रोग, लेबिरिंथायटिस किंवा कोणत्याही विषाणूजन्य संसर्गामुळे संतुलनाशी संबंधित नस प्रभावित झाल्यास देखील व्हर्टिगो होऊ शकतो.

व्हर्टिगोची तपासणी एमआरआय किंवा सीटी स्कॅनने होते, पण या चाचण्याही लक्षात घेण्यासारख्या आहेत.

बेडसाइड टेस्ट... ईएनटी विशेषज्ञ क्लिनिकल सेटिंगमध्ये साध्या बॅलन्स टेस्ट किंवा व्हीएनजीद्वारे समस्या कोणत्या कानात आहे हे शोधू शकतात.

कॅनाल रिपोजिशनिंग मॅन्युव्हर्स... जर समस्या कानाच्या क्रिस्टल्सची असेल, तर डॉक्टर काही विशेष व्यायाम करायला सांगतात.

ड्रग हिस्ट्री... डॉक्टर औषधांची तपासणी करतात जेणेकरून चक्कर कोणत्याही औषधाच्या दुष्परिणाममुळे तर येत नाहीये हे कळू शकेल.

व्हर्टिगो मुख्यत्वे दोन प्रकारचा असतो. पहिला 'पेरिफेरल', जो कानाच्या समस्यांशी संबंधित आहे. बहुतेक प्रकरणांमध्ये हेच घडते. दुसरा 'सेंट्रल', जो मेंदूच्या समस्यांमुळे होतो. मेंदूशी संबंधित कारणे गंभीर असू शकतात. याच्या लक्षणांमध्ये एक ऐवजी दोन गोष्टी दिसणे (डबल व्हिजन), खूप तीव्र डोकेदुखी आणि अचानक पडणे यांचा समावेश आहे.

# कॉक्रोचचे आंदोलन



जंतरमंतरवरील आंदोलनाच्या वृत्तांकनाला देशातील प्रमुख वाहिन्यांनी दुय्यम स्थान दिले. प्रमुख वाहिन्या 'सरकारी' वाहिन्या झाल्या आहेत, या आरोपाला यातून बळ मिळाले आहे. कॉक्रोच जनता पार्टीचे राजधानीतील जंतरमंतरवर झालेले आंदोलन हा केंद्र सरकारसह देशातील सर्व प्रस्थापित राजकीय पक्षांना इशारा आहे. याचबरोबर, अतिवरिष्ठ पदावर काम करताना संकेत ओलांडून काही भाष्य करणे योग्य नसते, हा धडा देखील मिळावा! सरन्यायाधीश सूर्यकांत यांनी एका खटल्यासंदर्भात वापरलेला 'झुरळ' हा शब्द कॉक्रोच जनता पक्षाच्या जन्माला कारणीभूत ठरला. सरन्यायाधीशांनी खुलासा केला; पण तोपर्यंत उशीर झाला होता.

समाजमाध्यमांवर व्यंग्यरुपात कॉक्रोच जनता पार्टीचा उदय झाला आणि पाहता पाहता समाज माध्यमांवर याची सुरुवात करणार्या अभिजीत दिपके यांना लाखो फॉलोअर्स मिळाले. दिपके अमेरिकेत होते. तेथून त्यांनी आंदोलनाची हाक दिली. 'परदेशातील गटांचे धोरण राबविणारे' वगैरे शिक्के मारण्याची चढाओढ सुरु झालीच आहे; पण यातून व्यवस्थेतील दोष लपणार आहेत का? या दोषांमुळे अस्वस्थ असणार्या तरुणाईच्या भावना दडपून टाकता येणार आहेत का? याचे उत्तर 'नाही', असेच द्यावे लागेल! लाखो खटले वर्षानुवर्षे न्यायालयात रेंगाळत पडले आहेत. न्यायाला विलंब म्हणजे न्याय नाकारणे. कोणत्याही सरन्यायाधीशांकडून ते मनावर घेतले गेल्यास न्यायासाठी वर्षानुवर्षे प्रतीक्षा करणार्या सामान्यांच्या जीवनात आशा निर्माण होईल. अलीकडेच सर्वोच्च न्यायालयाने खटले निकालात काढण्यासाठी कालमर्यादा घातली आहे. यासारख्या अनेक सुधारणा आवश्यक आहेत. देशातील प्रशासकीय यंत्रणांना भ्रष्टाचाराने पोखरले असून न्याय व्यवस्थेतही अपप्रवृत्तींचा शिरकाव झाला आहे. सर्वोच्च न्यायालयाकडून याबाबत सक्रिय भूमिका अपेक्षित आहे. त्याऐवजी 'झुरळ' शब्द वापरुन युवकांना डिवचण्यात आले.

'नीट'चे पेपर फुटल्याने केंद्रीय शिक्षण विभागाची पुरती बेअब्रू झाली. शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी या पेपर फुटीतील भ्रष्टाचाराची साखळी उघड झाल्यावर तातडीने पायउतार व्हायला हवे होते. खुर्ची सोडण्याची त्यांची इच्छा नाही, हे दिसल्यावर पंतप्रधानांनी त्यांना बाहेरचा रस्ता दाखविणे आवश्यक होते. हे दोन्ही झाले नाही. लाखो विद्यार्थ्यांच्या भविष्याशी शिक्षण विभागाने केलेले खेळ अक्षम्य असून तोच मुद्दा कॉक्रोच जनता पक्षाने हातात घेतला.

शिक्षणमंत्र्यांना हाकला

'नीट' प्रकरणानंतर काही विद्यार्थ्यांनी आयुष्य संपवले. सरकारसाठी हे लांच्छनास्पद आहे. आधी भारतीय जनता पक्षाची खिल्ली उडवण्यासाठी 'कॉक्रोच जनता पार्टी' असे व्यंग्यात्मक नाव देण्यात आले. ते भाजप आणि भाजप समर्थकांसाठी जखमेवर मीठ चोळणारे होते. त्यात भर म्हणजे 'नीट' पेपरफुटीचा ज्वलंत प्रश्न 'कॉक्रोच'ने हातात घेतला! या व्यासपीठाचे भवितव्य काय? हा पुढचा प्रश्न झाला. आज तरी हे व्यासपीठ डिजिटलची सीमा ओलांडून रस्त्यावर उतरलेले दिसते. अमेरिकेतून येताच अभिजीत दिपके जंतरमंतरवर आंदोलनासाठी रवाना झाले. समाजमाध्यमांवरील त्यांच्या पोस्ट हटविण्यात आल्या होत्या; पण सरकारने आंदोलनाला परवानगी दिली, मर्यादांचे भान ठेवत कॉक्रोचने आंदोलन केले, या दोन्ही बाबी सकारात्मक आहेत. प्रधान यांनी राजीनामा न दिल्यास देशभर आंदोलन केले जाईल, असे 'कॉक्रोच'ने जाहीर केले आहे; पण कोणी न्याय्य मागणी केल्यास आपण झुकल्याचा संदेश जातो, अशी भाजप नेतृत्वाची चमत्कारिक मानसिकता बनली आहे. त्यामुळे प्रधान राजीनामा देतात, की केंद्र सरकार 'कॉक्रोच'ला पुढच्या आंदोलनाची संधी देते, हे पाहायला हवे. बांगला देश, नेपाळ या शेजारी देशांमध्ये 'जेन झी' नावाने सत्तांतर झाले; पण सूत्रे परदेशातून हलवली गेली. महमद युनुस यांची किळसवाणी कारकीर्द त्याचा पुरावा होती. आता नेपाळमध्ये बालन शहांना सत्तेवर बसविणारी तरुणाई त्यांच्या विरोधात रोष व्यक्त करत आहे. 'कॉक्रोच'बाबत आताच कुठल्याही निष्कर्षावर येणे अथवा बाह्य शक्तींशी या संघटनेचा संबंध जोडणे घाईचे ठरेल. त्याऐवजी सर्व स्तरावर पारदर्शी कारभार आणि हडेलहप्पी वृत्तीपासून अंतर, हेच देशातील संवाद, सौहार्द टिकवण्यात महत्त्वाचे ठरेल. शक्तीहीन झालेल्या विरोधकांनी नव्याने उदयाला येणार्यांमध्ये आपले भवितव्य शोधणे हा देखील आत्मघात ठरणार आहे.

## कडेकोट बंदोबस्त

परीक्षित राजाची हकीकत वाचकांना ठाऊक असेलच. परीक्षिताच्या आजोबांनी (अर्जुन) खांडव वन जाळले होते. त्यात अनेक नाग मारले गेले होते. परीक्षित राजाला नागाकडून मृत्यू येईल, असा शाप मिळाल्यावर त्याने एक उंच मनोरा बांधला. त्याभोवती कडेकोट बंदोबस्त केला. परवानगीशिवाय कोणीही-काहीही आत येणार नाही, अशी व्यवस्था उभारली. त्या मनोर्यात तो राहू लागला. त्याला वाटले की, आपण आता सुरक्षित झालो; पण एके दिवशी त्याला बोरे खायची इच्छा झाली. त्याने बोरे मागवली. बोरे खाताना एका बोरातून अळी निघाली. ती अळी नसून, तो तक्षक नाग होता. त्याने परीक्षित राजाला दंश करून ठार केले. जे अप्रिय घडणार, ते अटळ आहे. स्वतःभोवती किती कड्या-कुलपे घातली तरी, त्यापासून सुटका नाही. परीक्षित राजाच्या कथेचा संदर्भ आजही लागू पडतो. साठ-सत्तर वर्षांपूर्वी केव्हातरी गावाबाहेर बांधलेला एक टुमदार दुमजली वाडा. तळमजल्यावर सहा खोल्या, वर सहा खोल्या, त्यावर गच्ची. पुढं छोटंसं अंगण. काळाच्या ओघात गावाचे शहर झाले, वाढले. वाडा आता गावाच्या मध्यभागी म्हटला जाऊ लागला. काळाच्याच ओघात वाड्याच्या आसपासचे वाडे एकेक करून बिल्डरांनी घेतले आणि तिथे टोलेजंग इमारती बांधल्या. वाड्यासमोरचा रस्ता आता हमरस्ता बनला. रस्त्यावर मॉल, हॉटेल्स, बार, पानटपर्या वगैरे विकासाच्या पाऊलखुणा अवतरल्या. हाच एक वाडा शाबूत राहिला.

वाडा शाबूत राहण्यामागे काही रहस्य नव्हतं. तळमजल्यावर राहणारे वाड्याचे मालक बाबूअण्णा आणि पुष्पाकाकू ऐंशीच्या उंबरठ्यावर आहेत. बाबूअण्णाचा सहस्रचंद्र सोहळा जवळ आला आहे. वाड्यात फक्त दोघेच राहतात. वरच्या मजल्यावर दोन भाडेकरू होते. तळमजल्यावरच्या एकीकडच्या भागात बाबूअण्णाचा चुलत भाऊ राहत होता. ही सगळी माणसं वाडा सोडून गेलीत. बाबूअण्णाची एकुलती मुलगी विदेशात राहते. ती आणि जावई एकदोन वर्षात गाशा गुंडाळून परत येणार आहेत. इथं आल्यावर बिल्डरची मदत न घेता वाडा पाडून तिथं स्वतःच्या गरजेनुसार बांधकाम करायचं, त्यांनी ठरवलं आहे. तळमजल्यावर स्वतःच्या व्यवसायासाठी कार्यालय, वरचे मजले निवासी आणि त्यातील दोन सदनिका स्वतःसाठी ठेवून बाकीच्या विकणे. यासाठी त्यांनी भारतात खेटे घालून वाड्यातले भाडेकरी आणि तळमजल्यावरचे चुलत भावंडाचे बिर्हाड घासाघीस करून घालवले. आता वाड्यात फक्त त्यांची मम्मी आणि डॅडी आहेत. आसपासचे वातावरण, संभाव्य गुंडगिरी, चोर्यामार्या वगैरेचा विचार करून मुलीने मम्मी आणि डॅडीच्या सुरक्षेसाठी वाड्याभोवतीचे कुंपण उंच आणि भक्कम करून घेतले आहे. रोज रात्री जेवणं झाली की, डॅडी अंगणाच्या फाटकाला जाडजूड कुलूप लावतात. मग, आतला उंच सागवानी दरवाजा बंद करून घेतात. सकाळी जाग आली की, दरवाजे उघडतात.

सकाळी कामाला येणार्या मोलकरणीकडे फाटकाच्या कुलपाची किल्ली आणि सागवानी दाराची लॅच-की आहे. काही वेळा मम्मी आणि डॅडी उशिरा उठतात. मोलकरीण दारं उघडते, त्यांना झोपेतून उठवते आणि कामं उरकून निघून जाते.

एके रात्री जेवणं झाल्यावर डॅडीनी नेहमीप्रमाणे फाटक लावून घेतलं. सागवानी दार लावून घेतलं आणि झोपण्यापूर्वी वॉशरूमकडे जाताना पाय घसरून पडले. त्यांनी मारलेली हाक मम्मीना ऐकू आली नाही. कारण दोघांना वयोपरत्वे ऐकायला कमी येतं. अहंकारापोटी दोघांनीही श्रवणयंत्र घेणं टाळलं आहे. त्याच अहंकारापोटी चालताना काठी वापरणं टाळलं आहे.

## उपदेशकथाः आश्रय

एका माणसाला एकदा सापाचं पिल्लू मिळालं. त्यानं ते घरी आणलं व तो त्याची देखभाल करू लागला. त्याला बांबूचं नळकांडं करून दिलं. त्यात गवत वगैरे घालून त्याच्या राहण्याची सोय करून दिली. त्याला खाण्यापिण्याची व्यवस्था करून दिली. एकदा एक साधू तिथं आला. त्यानं हे पहिलं व तो त्या माणसाला म्हणाला, ङ्गङ्घहे काय करतोस भलतंच तू ! भलत्यावर प्रेम करून त्याला आश्रय देणं धोक्याचं आहे. उद्या तुझ्यावर जीवित गमावण्याची वेळ येईल. तेव्हा वेळीच सावध हो आणि हा नाद सोडून दे.ङ्क त्या माणसावर या उपदेशाचा काही परिणाम झाला नाही. एकदा काही कारणानं तो माणूस दोन दिवस बाहेरगावी गेला होता. तेथील सारी कामे आटोपून तो घरी परतला. आल्यावर त्यानं आपल्या लाडक्या सापाला हाक मारली. तो बाहेर येईना म्हणून त्याच्या घरात हात घातला. त्याबरोबर त्या सापानं दंश केला वत्या माणसाला प्राण गमवावे लागले.

कथा उपदेश : दुष्टाला आश्रय देऊ नये.


## (गुरु वचन) सार्थक जीवन

सुख व धर्माची स्थापना करणेच मानवी जीवनाचे लक्ष्य आहे. ईश्वराने जी शक्ती व पात्रता मानवाला दिली आहे तिचा सदुपयोग दुसऱ्यांची मदत करणे, त्याचे जीवन सुखी करण्यात आहे. शारीरिक गरजांची पुर्तता करण्यासाठी मेहनत आवश्यक आहे.

जीवनातील अडचणी सोडवून जो वेळ व शक्ती मिळते त्यास विश्वकल्याणात खर्च केले पाहिजे कारण हेच सर्व शास्त्रांचे सार आहे-श्अष्टादश पुराणेषु व्यासस्य वचनं द्वयम, परोपकाराय पुण्याय पापाय पर पीडनम्श। तात्पर्य म्हणजे मनुष्य जीवनाचा उद्देश परोपकार व पुण्यच आहे. जो मनुष्य जीवनात येऊन आपली विचारसरणी व भावनांना शुष्कता, नीरसता व कठोरता सारख्या दोषातून मुक्त होऊ शकला नाही तो जीवनाच्या वास्तविक रसग्रहण करण्यापासून वंचितच राहिल.

आनंदाचा स्त्रोत चांगल्या अनुभवांमध्ये आहे. भक्ती-प्रेम-समर्पण व सत्योपासनाद्वारे ईश्वर प्राप्त करणे शक्य आहे. ज्यांचे अंत:करण शुद्ध आहे, जे भावनांना मनात स्थान देत नाही त्यांना ईश्वर प्राप्ती सहज होते.

मानवी जीवनाचा बहुतांशी भाग आहार, निद्रा, भय इत्यादीत जातो. शारीरिक गरजा पुर्ण करण्यात बराच वेळ व शक्ती खर्च होते. एवढ्याच गोष्टी व्यस्त राहणे मानवी जीवनाचे लक्ष्य है? सृष्टीतील सर्व जीवांमध्ये सर्वश्रेष्ठ असल्यामुळे मानवाचे उत्तरदायित्व सुद्धा श्रेष्ठ आहे. जो आपल्या कर्तव्याकडे लक्ष देत नाही तो नक्कीच मनुष्यत्वाचा महान गौरव प्राप्त करण्याचा अधिकारी नाही. अमाप पैसा किंवा भौतिक सुख मिळवूनही जीवन खरेदी केले जाऊ शकत नाही. सद्भावच मानवाची सत्य व स्थायी संपत्ती आहे म्हणून जीवनाच्या प्रत्येक क्षणाला सद्गुण-संपादनातच खर्च करणे बुद्धिमत्ता आहे. मानवी जीवनास यशस्वी बनवणेच खरी दुरदृष्टीता आहे.



## १ Doctor Tips सल्ला डॉक्टरचा



दिवसातून फक्त दोनवेळा जेवण घेतल्याने त्यावर बऱ्याच प्रमाणावर नियंत्रण ठेवता येतं. तसंच आहारात छोटे-छोटे बदल केल्यानेही त्याचा मोठा फायदा फक्त साडेतीन महिन्यात होतो, असं सांगत डॉ. जगन्नाथ दीक्षित यांनी ङ्गमाझा कट्टाफ्ङ्क डाएटगप्पा मारल्या.बदलत्या जीवनशैलीमुळे गेल्या काही वर्षात विविध आजारांनी लोकांना ग्रासलं आहे. यात मधुमेह, रक्तदाब, वाढलेलं वजन यासारख्या अनेक आजारांचा समावेश आहे. मात्र दिवसातून फक्त दोनवेळा जेवण घेतल्याने त्यावर बऱ्याच प्रमाणावर नियंत्रण ठेवता येतं. तसंच आहारात छोटे-छोटे बदल केल्यानेही त्याचा मोठा फायदा फक्त साडेतीन महिन्यात होतो, असं सांगत डॉ. जगन्नाथ दीक्षित यांनी ङ्गमाझा कट्टाफ्ङ्क डाएटगप्पा मारल्या.

## २ Joke विनोद





**शिपाई : खबरदार, एक पाऊल पुढे टाकशील तर...**

**चोर : तर काय करशील?**

**शिपाई : मला चार पावलं पुढं जावं लागेल.**

## ३ Message संदेश



Santa: mera beta raat bhar book ke saamne hee baita rahta hai.

Banta: lekin phir bhi woh fail kyu huaa?

Santa: wah book 'face-book' tha, isliye

## ४ Thought सुविचार




मावळत्या सूर्याला पाहून लोक दार लावून घेतात.– **शेक्सपिअर**

**संस्कृत सुभाषित**

**अन्यान्परिवदन्साधुर्यथा हि परितप्यते**
**तथा परिवदन्नन्यांस्तुष्टो भवति दुर्जन:।।**
**(आदिपर्व, अध्याय ७४, ेक ९२ महाभारत)**

# मनोरंजक महाशब्दकोड्यांचा समाचार



### आडवे शब्द

१. न्याहरी, नाश्ता
४. हिंमतीची हद्द
७. एकदम योग्य
११. हरिवंशराय बच्चन याची प्रसिद्ध कविता- 'लहरों से डरकर नौका पार नहीं होती, कोशिश करनेवालों की -- नहीं होती!
१२. ग्रामीण बोलीत गौर
१३. पावा
१४. शंभरी गाठणारा
१७. जोरात कोसळणे-ओतणे
१९. मोहिनी, अंमल
२१. खंडाने शेती करणारा
२२. पहारा
२४. काव्यात कोण
२५. वाकलेला
२६. वाल्याचा वाल्मिकी करणारा मंत्र
२७. झूल घेतलेला
२९. अनुतीर्ण
३१. पोहणे, तरंगणे
३२. गुलाबजामुनचा रस
३३. नेटका
३५. मनीमाऊचे वाघोबाशी नाते
३७. भानगड
३८. राजाची आई
३९. संभवमि युगेयुगे'चे आश्वासन देणारा अवतार
४२. च्या पुढे, च्या समक्ष
४४. शेतकऱ्याला दिलेले कर्ज
४५. विक्रमवीर सचिनचे वडील
४७. मासा
४९. माफी
५०. अलिप्त
५२. राबता, जाणे-येणे
५३. एकरूप, एकतान
५६. लोकहित
५७. श्रीयुत, श्रीमान
५९. किंमत
६१. मदनाची सहचरी
६२. यमनगरी
६३. घड्याळाचा आवाज
६५. अमंगल जाळण्याचा सण
६६. रसभंग, विचका
६८. तलवारीचे घर
७०. अंत:करण
७२. रामचरित मानस लिहिणारे
७४. खास अ.नगरकडील
७६. संगोपन- --- पोषण
७७. आश्चर्य
७९. जोरदार
८०. सुबक, कोरून काढलेला
८१. शिवशाहीतील प्रमुख शस्त्र

### उभे शब्द

१. दुश्चिन्ह
२. पापणी (हिंदी)
३. शुष्कता
४. शक्तीमान, पराक्रमी
५. त्वरेने, वेगाने
७. खवलेले खोबरे
८. दूरदेश
९. लुच्चा, खोटा
१०. लहानसहान
१५. शिव्याशाप
१६. लढतना आलेले मरण
१८. जर्दाळूचे बी
२०. पैंजणांचा नाजूक आवाज
२३. बळीला पाताळात गाडणारा
२४. उणीव
२६. धान्याचा ढीग
२८. कपाळ फुटणे
३०. च्या जवळ
३२. दररोजचा, परिपाठातला
३४. निष्णात, वाकबगार
३५. आईचा भाऊ
३६. तहान
३७. द्राक्षाचा वा मोत्यांचा आणि फुलांचाही
३९. अशक्त, बारीक
४०. निरूपयोगी भटकंती
४१. पत्त्यातील पाच-तीन-दोन
४३. श्रीविष्णू
४६. कष्टाळू
४८. मऊ
५१. रायगडवरील एक कडा
५२. प्रत्येक संसारी माणसाची अवस्था याच्याप्रमाणे असते!
५४. तृष्णा
५५. नवऱ्याचा भाऊ
५६. चकचकीत, --- बरक
५८. लज्जित, वरमलेला
५९. मध्यंतरी
६०. गर्दी
६१अ. पण
६५. शिवकालीन नाणे
६७. जहाज
६९. रोकड
७१. प्रहार, वार
७३. वारा
७५. कागदाचे परिमाण
७७. नूतन
७८. संघर्ष, प्रतिकार

### आडवे उत्तर

१.अल्पोपहार ४.मजल ७.चपखल ११.हार १२.गवर १३.बासरी १४.शतकवीरा १७.बदबदा १९.गारूड २१.कूळ २२.रखवाली २४.कवण २५.नत २६.रामराम २७.झूलकरी २९.अनुत्तीर्ण ३१.तरण ३२.पाक ३३.नीटस ३५.मावशी ३७.घोळ ३८.राजमाता ३९.कृष्णावतार ४२.समोर ४४.तगाई ४५.रमेश ४७.मीन ४९.क्षमा ५०.तटस्थ ५२.वावर ५३.रम ५६.जनकल्याण ५७.महाशय ५९.दरदाम ६१.रती ६२.नरक ६३.टिकटिक ६५.होळी ६६.बेरंग ६८.म्यान ७०.मन ७२.तुलसीदास ७४.नगरी ७६.भरण ७७.नवल ७९.दमदार ८०.कातीव ८१.ढाल तलवार

### उभे उत्तर

१.अपशकुन २.पलक ३.रखरख ४.महाबली ५.जरड ७.चव ८.परगाव ९.लबाड १०.बारीकसारीक १५.तळतळाट १६.वीरगती १८.बदाम २०.रूणझुण २३.वामनावतार २४.कमतरता २६.रास २८.कपाळमोक्ष ३०.पाशी ३२.नित्यातला ३४.सराईत ३५.मामा ३६.तृष्ण ३७.घोस ३९.कृश ४०.वणवण ४१.रमी ४३.रमानायक ४६.मेहनत ४८.नरम ५१.टकमक ५२.वाल्या कोळी ५४.तहान ५५.दीर ५६.जरक ५८.शरमिंदा ५९.दरम्यान ६०.दाट ६१अ.परंतु ६५.होन ६७.गलबत ६९.नगद ७०.मणका ७१.घाव ७३.समीर ७५.दम ७७.नव ७८.लढा




## थोडक्यात/ संक्षिप्त

### भारत-इंग्लंड टी-२० सामन्यांची वेळ बदलली, ११ नाही तर 'या' वेळेत होणार लाईव्ह स्ट्रिमिंग

मुंबई–भारत विरुद्ध इंग्लंड यांच्यामध्ये बीसीसीआयने टी–२० मालिका त्याचबरोबर एकदिवसीय मालिकेचे आयोजन केले आहे. श्रेयस अय्यर भारतीय संघाचे नेतृत्व करताना दिसणार आहे तर काही नव्या खेळाडूंना या मालिकेत खेळण्याची संधी मिळाली आहे. अफगाणिस्तानविरुद्ध एकदिवसीय मालिका झाल्यानंतर भारताचा संघ इंग्लंड दौऱ्यावर जाणार आहे. ही मालिका सुरू होण्याआधी आता या मालिकेच्या सामन्यांच्या वेळेत बदल करण्यात आले आहेत. इंग्लंड आणि वेल्स क्रिकेट बोर्डाने भारताविरुद्धच्या पाच २० आंतरराष्ट्रीय सामन्यांची सुरुवात ही आता एक तास आधी करण्याचा निर्णय घेतला आहे. भारतामध्ये टेलिव्हिजनवर पाहणाऱ्या प्रेक्षकांसाठी हे सामने पाहता यावेत यासाठी आधी हे सामने रात्री ११ वाजता सुरू केले जाणार होते. पण आता या सामन्यात बदल करण्यात आला आहे आणि भारतीय वेळेनुसार हे सामने रात्री दहा वाजता सुरू होणार आहेत.

### पाकिस्तानने रुमबाहेर बंदुका ठेवल्या होत्या, बांगलादेशच्या कर्णधाराच्या विधानाने खळबळ

दिल्ली–यंदाच्या टी–२० वर्ल्डकपमध्ये बांगलादेश संघावरुन मोठा वाद निर्माण झाला होता. भारताने आयपीएलमध्ये खेळाडूवर बंदी घातल्यानंतर त्याला प्रत्युत्तर म्हणून बांगलादेशने सुरक्षेचा हवाला देत भारतात टी–२० वर्ल्डकप खेळणार नसल्याची भूमिका घेतली होती. आमचे सामने भारताबाहेर खेळवले जावेत अशी बांगलादेशची मागणी होती. मात्र ही मागणी आयसीसीने नाकारली आणि अखेर बांगलादेश स्पर्धेतून बाहेर पडला. दरम्यान बांगलादेशचा टी–२० संघाचा कर्णधार लिटन दासने २०२६ चा टी–२० वर्ल्डकप न खेळण्यासंबंधी मोठा खुलासा केला आहे. यानंतर क्रिडाविश्वात एकच खळबळ उडाली आहे. आमच्या खेळाडूंना भारतात स्पर्धा खेळायची होती. मात्र अंतिम निर्णय आपल्या हातात नव्हता असं लिटन दासने म्हटलं आहे. एका मुलाखतीत त्याने केलेल्या या दाव्यामुळे एकच खळबळ उडाली आहे. लिटन दासच्या म्हणण्यानुसार, खेळाडू आणि अधिकाऱ्यांची एक बैठक झाली होती. या बैठकीत त्यांनी भारतामधील त्यांच्या सुरक्षेसंदर्भात काही चिंता असल्याचं सांगण्यात आलं होतं.

### २१ वर्षानंतर बांगलादेशने करून दाखवले; ऑस्ट्रेलियाला नमवण्याचा केला पराक्रम

दिल्ली–तब्बल २१ वर्षानंतर बांगलादेशने वनडेत ऑस्ट्रेलियाला नमवण्याची किमया केली. बांगलादेशने दिलेल्या २८५ धावांचा पाठलाग करताना ऑस्ट्रेलियाच्या १९१९ धावा झाल्या होत्या. यानंतर जोरदार पावसाचं आगमन झालं. वीजाही कडाडल्या. पावसाचा जोर न ओसरल्याने डकवर्थ लुईस पध्दतीने बांगलादेशला विजयी घोषित करण्यात आलं. बांगलादेशने हा मुकाबला ८६ धावांनी जिंकला.या विजयासह बांगलादेशने तीन सामन्यांच्या मालिकेत १–० अशी आघाडी घेतली आहे.ऑस्ट्रेलियाने नाणेफेक जिंकून गोलंदाजीचा निर्णय घेतला. बांगलादेशकडून तांझिड हसन (५४), नझमुल हुसेन शंटो (६७) यांनी मोठ्या धावसंख्येचा पाया रचला. तांझिडने त्याच्या खेळीत ७ चौकार आणि एक षटकार लगावला. शंटोने ९ चौकार आणि एका षटकारासह अर्धशतक साजरं केलं. तौहिद हृदॉयने ३१ धावांची खेळी करत धावफलक हलता ठेवला. मोसादेक होसेनने ७० चेंडूत ७ चौकार आणि ३ षटकारांसह नाबाद ८६ धावांची खेळी केली.

# १६ चेंडूत १६ धावा आणि हातात ४ विकेट असतानाही श्रीलंका हारली!

## भारताच्या एका गोलंदाजाने अख्खा गेमच फिरवला





मुंबई–भारत अ, श्रीलंका अ आणि अफगाणिस्तान अ यांच्यामध्ये ट्राय सिरीज खेळवली जात आहे. या मालिकेतील पहिला सामना आज खेळवण्यात आला, या सामन्यात श्रीलंका अ आणि भारत अ या संघामध्ये सामना पार पडला. पहिला सामना हा भारत अ विरुद्ध श्रीलंका अ यांच्यामध्ये रोमांचक सामना पार पडला. या सामन्यात भारताच्या संघाने ८ धावांनी विजय मिळवला. या सामन्यामध्ये भारतीय संघासाठी अर्शद खान हा ट्रम्प कार्ड ठरला आणि टीम इंडियाने गमावलेला सामना हा भारताला जिंकून देण्यात मोलाचे योगदान दिले. आता या सामन्यात शेवटच्या दोन ओव्हरमध्ये नक्की काय झाले यासंदर्भात जाणून घ्या.

भारत अ विरुद्ध श्रीलंका अ यांच्यामध्ये सामना झाला, या सामन्यात भारताच्या संघाने पहिले फलंदाजी करत २७७ धावा केल्या. या सामन्यात श्रीलंकेला भारतीय संघाने २६९ धावांवर गुंडाळले. भारताच्या संघाने ४७.१ ओव्हरमध्ये ६ विकेट्स गमावले होते, त्यानंतर अर्शद खानने पूर्णपणे खेळ बदलला आणि श्रीलंकेचा तोंडचा खास हिसकावला. श्रीलंकेने आपल्या फलंदाजीच्या डावात सामन्यात आपले स्थान टिकवून ठेवले होते. तथापि, ४९ व्या षटकात अर्शद खानने तीन बळी घेत भारत 'अ' संघाला विजय मिळवून दिला. भारताच्या संघाने अर्शद खानच्या या फिरकीच्या जोरावर संघाने पहिला विजय नोंदवला आहे.

भारतीय अ संघाचा उपकर्णधार ऋतुराज गायकवाड याने पहिले दोन विकेट्स लवकर गेल्यानंतर संघाचा कर्णधार तिलक वर्मा आणि ऋतुराजने संघाला सावरले. या सामन्यात ऋतुराज गायकवाड याने संघासाठी शतकीय खेळी खेळली, त्याने आजच्या सामन्यामध्ये ११४ चेंडूमध्ये १०१ धावा केल्या. यामध्ये त्याने ३ षटकार आणि ६ चौकार मारले. तर संघाचा कर्णधार तिलक वर्माने देखील प्रभावशाली खेळी खेळली. त्याने आजच्या सामन्यामध्ये ९७ चेंडूमध्ये ६० धावा केल्या. वैभव सुर्यवंशी आज ओपनिंगला आला होता पण तो संघासाठी फार काही करु शकला नाही त्याने आजच्या सामन्यात १४ धावा करुन विकेट गमावली. तर प्रभसिमरण सिंह हा देखील व्यस्तात बाद झाला त्याचा डाव २ धावांवर संपला. गोलंदाजांबद्दल सांगायचे झाले तर आयुष बडोनी, अर्शद खान, विप्राज निगम आणि अनुकुल रॉय यांनी प्रत्येकी दोन विकेट्स घेतले तर अनुकुल रॉय याने संघाला १ विकेट मिळवून दिला.



## उलानबातर ओपनमध्ये भारताला तीन सुवर्णांसह १७ पदके

उलानबातर : उलानबातर ओपन सिनियर रँकिंग सिरीज कुस्ती स्पर्धेच्या अंतिम दिवशी, पुरुषांच्या फ्रीस्टाइल प्रकारात दीपक (६१ किलो), सागर जगलान (७४ किलो) आणि दिनेश (१२५ किलो) यांनी सुवर्णपदके जिंकून भारताने आपल्या मोहिमेचा शानदार शेवट केला. या तिघांच्या केलेल्या प्रभावी कामगिरीमुळे, भारताने पुरुषांच्या फ्रीस्टाइल प्रकारात सात पदके मिळवली आहेत. भारताने फ्रीस्टाइल, ग्रीको–रोमन आणि महिलांच्या कुस्तीमध्ये एकूण १७ पदके जिंकली आणि सांघिक क्रमवारीत अव्वल तीनमध्ये स्थान मिळवले.



कॅनडातील ओंटारियोमधील मोनो येथे आयोजित रोडिओ टूरदरम्यान बॅरल रेसिंग स्पर्धेत भाग घेणारी एक काउगर्ल.

# ऐनवेळी मोहम्मद सिराजला संघातून बाहेर काढले, नेमके काय घडले?



मुंबई–भारतीय क्रिकेट संघाच्या आयर्लंड आणि इंग्लंड दौऱ्यापूर्वी मोठा बदल करण्यात आला आहे. भारतीय क्रिकेट नियामक मंडळाने वेगवान गोलंदाज मोहम्मद सिराजला संघातून विश्रांती देण्याचा निर्णय घेतला आहे. त्याच्या जागी आता प्रसिद्ध कृष्णाचा संघात समावेश करण्यात आला आहे.

सध्या अफगाणिस्तानचा संघ भारत दौऱ्यावर असून नुकत्याच झालेल्या कसोटी सामन्यात भारताने डाव आणि तब्बल ३०० धावांनी विजय मिळवला. त्यानंतर दोन्ही संघांमध्ये तीन सामन्यांची वनडे मालिका खेळवली जाणार आहे. या मालिकेतील पहिला सामना १३ जून रोजी होणार आहे. त्यानंतर भारतीय संघ आयर्लंड दौऱ्यावर रवाना होईल, जिथे दोन सामन्यांची टी–२० मालिका खेळली जाईल. या मालिकेनंतर टीम इंडिया थेट इंग्लंडमध्ये दाखल होणार असून तेथे पाच सामन्यांची टी–२० मालिका खेळली जाणार आहे. काही दिवसांपूर्वीच भारतीय संघाची घोषणा, आता अचानक बाहेर

या महत्त्वाच्या दौऱ्यांसाठी काही दिवसांपूर्वीच भारतीय संघाची घोषणा करण्यात आली होती. मात्र आता बीसीसीआयने अचानक संघात बदल जाहीर केला आहे. बोर्डाने दिलेल्या माहितीनुसार, मोहम्मद सिराजला वर्कलोड मॅनेजमेंटअंतर्गत विश्रांती देण्यात आली आहे. बीसीसीआयची वैद्यकीय टीम आणि संघ व्यवस्थापन यांच्यात झालेल्या चर्चेनंतर हा निर्णय घेण्यात आला. आगामी व्यस्त आंतरराष्ट्रीय हंगाम लक्षात घेता सिराज पूर्णपणे तंदुरुस्त राहावा आणि दुखापतीचा धोका टाळावा, यासाठी खबरदारीचा उपाय म्हणून त्याला विश्रांती देण्यात आली आहे.सिराजच्या अनुपस्थितीत प्रसिद्ध कृष्णाला मोठी संधी मिळाली आहे. उंच, अतिरिक्त उसळी आणि वेगाच्या जोरावर प्रसिद्ध कृष्णा प्रतिस्पर्धी फलंदाजांसाठी धोकादायक ठरू शकतो. इंग्लंडमधील खेळपट्ट्यांवर त्याची गोलंदाजी भारतीय संघासाठी उपयुक्त ठरू शकते, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

श्रेयस अय्यर टीम इंडियाचा नवा कर्णधार

दरम्यान, या मालिकांमधून भारतीय टी–२० संघात नव्या पर्वाची सुरुवात होताना दिसत आहे. श्रेयस अय्यरकडे टी–२० संघाचे नेतृत्व सोपवण्यात आले असून तो आता पूर्णवेळ कर्णधाराच्या भूमिकेत दिसणार आहे. सूर्यकुमार यादवला खराब फॉर्ममुळे संघाबाहेर ठेवण्यात आले आहे. तर युवा फलंदाज तिलक वर्माला उपकर्णधारपदाची जबाबदारी देण्यात आली आहे. याशिवाय सर्वाधिक चर्चेत असलेले नाव म्हणजे १५ वर्षीय वैभव सूर्यवंशी. अत्यंत कमी वयात भारतीय संघात स्थान मिळवणाऱ्या वैभवकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. त्याला अंतिम अकरामध्ये संधी मिळते का, हे पाहणे उत्सुकतेचे ठरणार आहे.आयर्लंड आणि इंग्लंडविरुद्धच्या टी–२० मालिकांसाठी भारतीय संघ

श्रेयस अय्यर (कर्णधार), अभिषेक शर्मा, संजू सॅमसन, ईशान किशन, शिवम दुबे, तिलक वर्मा (उपकर्णधार), नितीश कुमार रेड्डी, अक्षर पटेल, वॉशिंग्टन सुंदर, वरुण चक्रवर्ती, रवी बिश्नोई, हर्षित राणा, अर्शदीप सिंग, प्रिन्स यादव, वैभव सूर्यवंशी आणि प्रसिद्ध कृष्णा.

# टीम इंडियात शेवटच्या क्षणी बदल, गंभीरच्या फेवरेटची एन्ट्री!

मुंबई–आयर्लंड आणि इंग्लंडविरुद्धच्या टी–२० सीरिजसाठी निवड झालेल्या टीम इंडियामध्ये अचानक मोठा बदल करण्यात आला आहे. फास्ट बॉलर मोहम्मद सिराजला अचानक टी–२० सीरिजमधून बाहेर करण्यात आलं आहे. सिराजऐवजी प्रसिद्ध कृष्णाला टीम इंडियामध्ये स्थान देण्यात आलं आहे.

मोहम्मद सिराजची आयर्लंड आणि इंग्लंडविरुद्धच्या टी–२० सीरिजसाठी टीम इंडियामध्ये निवड झाली होती, तसंच जपानमध्ये होणाऱ्या आशियाई गेम्ससाठी तो टीमचा भाग नव्हता. टीम इंडिया आयर्लंडमध्ये २ आणि इंग्लंडविरुद्ध ५ टी–२० मॅच खेळणार आहे.

सिराज टीमबाहेर का झाला?

'फास्ट बॉलर मोहम्मद सिराजला आयर्लंड आणि इंग्लंडविरुद्धच्या आगामी टी–२० सीरिजमधून बाहेर करण्यात आलं आहे. बीसीसीआयची मेडिकल टीम आणि टीम मॅनेजमेंटसोबत चर्चा केल्यानंतर सिराजला वर्कलोड मॅनेजमेंट म्हणून आराम देण्याचा सल्ला देण्यात आला आहे', असं बीसीसीआयने त्यांच्या प्रसिद्धी पत्रकात सांगितलं आहे.

'टीम इंडिया पुढच्या वर्षभरात भरपूर क्रिकेट खेळणार आहे, त्यामुळे खबरदारीचा उपाय म्हणून त्याला आयर्लंड आणि इंग्लंडविरुद्धच्या टी–२० सीरिजमधून बाहेर ठेवण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. निवड समितीने सिराजच्या जागी प्रसिद्ध कृष्णाचा टीममध्ये समावेश केला आहे', असं बीसीसीआयने सांगितलं आहे.सिराजला टी–२० वर्ल्ड कपच्या भारतीय टीममध्ये शेवटच्या क्षणी संधी देण्यात आली होती. तर आयपीएल २०२६ मध्ये सिराज गुजरात टायटन्सकडून खेळला होता, ज्यात त्याने १७ सामन्यांमध्ये १९ विकेट घेतल्या. तसंच अफगाणिस्तानविरुद्धच्या एकमेव टेस्टमध्येही सिराज खेळला होता.


श्रेयस अय्यर (कर्णधार), अभिषेक शर्मा, संजू सॅमसन, इशान किशन, शिवम दुबे, तिलक वर्मा, नितीश कुमार रेड्डी, अक्षर पटेल, वॉशिंग्टन सुंदर, वरुण चक्रवर्ती, रवी बिष्णोई, हर्षित राणा, अर्शदीप सिंग, प्रिन्स यादव, वैभव

## फिफा वर्ल्ड कप सुरू होण्यापूर्वीच मोठा वाद

दिल्ली–क्रीडा जगतातील सर्वात मोठा उत्सव म्हणजेच फिफा फुटबॉल वर्ल्ड कप सुरू होण्यासाठी आता अवघे दोनच दिवस उरले आहेत. मात्र, हा फुटबॉल महाकुंभ सुरू होण्यापूर्वीच एक आंतरराष्ट्रीय वाद निर्माण झाला आहे. इराण फुटबॉल फेडरेशनने अधिकृत पत्रक प्रसिद्ध करून थेट यजमान देश अमेरिकेवर अत्यंत गंभीर आरोप केले आहेत.या वर्षी फिफा वर्ल्ड कपचे यजमानपद अमेरिका, कॅनडा आणि मेक्सिको हे तीन देश संयुक्तपणे भूषवत आहेत. इराण फुटबॉल फेडरेशनचा असा आरोप आहे की, अमेरिकेने राजकीय द्वेषापोटी इराणच्या ग्रुप स्टेज मॅचेसच्या तिकिटांचं वाटप अचानक रद्द केलं.

अमेरिकेकडून मुद्दामहून इराणी प्रेक्षकांना स्टेडियममध्ये येण्यापासून रोखलं जात असल्याचा दावा इराणने केला आहे.मंगळवारी एक विशेष निवेदन जारी करताना इराण फुटबॉल फेडरेशनने अमेरिकेच्या या भूमिकेचा तीव्र शब्दांत निषेध केला. त्यांनी म्हटलं की, ''फिफा वर्ल्ड कप सुरू होण्यासाठी अवघे २ दिवस उरले आहेत.

# बिझनेसच्या खेळातही विराट कोहलीच किंग! ३,५४२ कोटींच्या ब्रँड व्हॅल्यूसह देशात नंबर १




मुंबई–भारतीय क्रिकेटचा 'किंग' विराट कोहली आता क्रिकेटच्या मैदानाबाहेरही तुफान खेळी करत आहे. जाहिरात आणि बिझनेसच्या दुनियेत विराटने मोठमोठ्या सेलिब्रिटींनी धोबीपछाड दिला आहे. 'फॉर्च्यून इंडिया' आणि जागतिक ब्रँड कन्सल्टन्सी 'इंटरब्रँड' यांनी संयुक्तपणे देशातील २५ सर्वात मौल्यवान सेलिब्रिटीजवर एक अहवाल प्रसिद्ध केला. त्यानुसार, विराट कोहली तब्बल ३,५४२ कोटी रुपयांच्या ब्रँड व्हॅल्यूसह भारतातील सर्वात 'व्हॅल्यूएबल' सेलिब्रिटी ठरला आहे. विशेष म्हणजे या यादीत विराटने बॉलिवूडचा बादशहा शाहरुख खान ते मास्टर ब्लास्टर सचिन तेंडुलकर यांसारख्या धुरंधरांना मागे टाकले आहे.

शाहरुख दुसऱ्या तर प्रियांका चोप्रा तिसऱ्या स्थानावर

इंटरब्रँडच्या या विशेष अहवालात पहिल्या १० स्थानांवर क्रीडा आणि चित्रपट क्षेत्रातील लोकांचे वर्चस्व



### शाहरुख–सचिन पडले मागे

पाहायला मिळत आहे. पहिल्या १० सेलिब्रिटींच्या यादीमध्ये ३ क्रिकेटर्स आणि ७ चित्रपट ताऱ्यांना स्थान मिळालं आहे. जागतिक पातळीवर भारताचे नाव गाजवणारी देशी गर्ल प्रियांका चोप्रा जोनस या यादीत तिसऱ्या स्थानावर आहे. विशेष म्हणजे आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधून निवृत्ती घेतल्यानंतरही भारताचा माजी कर्णधार महेंद्रसिंग धोनीचा जलवा कायम आहे. या शर्यतीत तो चौथ्या स्थानावर आहे.

दीपिका, रश्मिका आणि स्मृती मंधानाचाही बाजारात दबदबा

टॉप–१० च्या बाहेर जर आपण संपूर्ण टॉप २५ च्या यादीवर नजर टाकली, तर महिलांमध्ये प्रियांका चोप्रा पाठोपाठ दीपिका पादुकोणने ११ वे स्थान आणि साऊथची नॅशनल क्रश रश्मिका मंदानाने १७ वे स्थान मिळवत बाजी मारली आहे. यांच्या व्यतिरिक्त बॉलिवूड अभिनेत्री कृती सेनन, साऊथची लेडी सुपरस्टार नयनतारा आणि भारतीय महिला क्रिकेट संघाची स्टार फलंदाज स्मृती मंधाना हिनेही या यादीत आपले स्थान पक्के केले आहे. मनोरंजन आणि क्रीडा क्षेत्रातील इतर दिग्गजांमध्ये गायक–अभिनेता दिलजीत दोसांझ, चित्रपट निर्माता करण जोहर, भारताचा माजी कर्णधार सौरव गांगुली आणि अभिनेता विकी कौशल यांचाही त्यांचीही मजबूत ब्रँड व्हॅल्यू पाहायला मिळाली.

| क्रमांक | सेलिब्रिटीचे नाव | क्षेत्र |
|---|---|---|
| १ | विराट कोहली | क्रिकेट (क्रीडा) |
| २ | शाहरुख खान | बॉलिवूड (मनोरंजन) |
| ३ | प्रियांका चोप्रा जोनस | बॉलिवूडहॉलीवूड |
| ४ | महेंद्रसिंग धोनी | क्रिकेट (क्रीडा) |
| ५ | रणवीर सिंग | बॉलिवूड (मनोरंजन) |
| ६ | अक्षय कुमार | बॉलिवूड (मनोरंजन) |
| ७ | अमिताभ बच्चन | बॉलिवूड (मनोरंजन) |
| ८ | सचिन तेंडुलकर | क्रिकेट (क्रीडा) |
| ९ | आलिया भट्ट | बॉलिवूड (मनोरंजन) |
| १० | अल्लू अर्जुन | (मनोरंजन) |

कशी मोजली जाते सेलिब्रिटीजची 'असली किंमत'?

सामान्यत: लोकांना असे वाटते की ब्रँड व्हॅल्यू म्हणजे केवळ सोशल मीडियावरील फॉलोअर्सची संख्या, वार्षिक कमाई किंवा बॉक्स ऑफिसवरील यश असते. मात्र, यावेळी इंटरब्रँडने वापरलेली संशोधन पद्धत पूर्णपणे वेगळी होती. यात विश्वसनीयता, जनसंपर्क, लोकप्रियता, जबाबदारी, ब्रँडची मजबूती आणि प्रभाव या निकषांचा समावेश होता.

## स्थानिक स्वराज्य संस्था निवडणूकीत ९८८ मतदार बजावणार मतदानाचा हक्क

* १८ जून रोजी सकाळी ८ ते दुपारी ४ वाजतापर्यंत मतदान
* २९ मतदान केंद्रावर होणार मतदान
* ३२ मतदान केंद्राध्यक्ष व १२८ इतर मतदान अधिकारी

**धाराशिव/लातूर प्रतिनिधी:** २६ उस्मानाबाद-लातूर-बीड स्थानिक प्राधिकारी मतदारसंघ द्विवार्षिक निवडणूक -२०२६ करिता येत्या १८ जून २०२६ रोजी सकाळी ८ दुपारी ४ वाजतापर्यंत मतदान होणार आहे. या निवडणुकीत एकूण ९८८ मतदार मतदानाचा हक्क बजावणार आहे.यामध्ये ४९९ पुरुष आणि ४८९ स्त्री मतदारांचा समावेश आहे.यामध्ये धाराशिव जिल्हा परिषदेचे २७ पुरुष ३६ स्त्री असे एकूण ६३ मतदार, जिल्ह्यातील दोन नगरपंचायत व आठ नगरपालिकांचे १३७ पुरुष आणि ११७ स्त्री असे एकूण २५४ मतदार,लातूर जिल्हा परिषदेचे ३२ पुरुष आणि ३७ स्त्री मतदार असे एकूण ६९ मतदार,पाच नगरपंचायत चार नगरपालिकांचे ११२ पुरुष,१०९ स्त्री,लातूर महानगरपालिकेचे ४१ पुरुष,३६ स्त्री असे ७७ मतदार,बीड जिल्ह्यातील पाच नगरपंचायत व सहा नगरपालिकांचे १५० पुरुष आणि १५४ स्त्री मतदार असे एकूण ३०४ मतदार यांचा समावेश आहे.

या निवडणुकीसाठी धाराशिव जिल्ह्यात ८,लातूर जिल्ह्यात १० आणि बीड जिल्ह्यात ११ अशा एकूण २९ मतदान केंद्रावर मतदार होणार आहे.सर्व २९ मतदान केंद्र हे तहसील कार्यालय येथे असणार आहे.

या निवडणुकीसाठी धाराशिव येथील ९ मतदान केंद्राध्यक्ष व ३६ इतर मतदान अधिकारी,लातूर येथे ११ मतदान केंद्राध्यक्ष व ४४ इतर मतदान अधिकारी आणि बीड येथे १२ मतदान केंद्राध्यक्ष व ४८ इतर मतदान अधिकारी राहतील. यामध्ये राखीव इतर मतदान अधिकारी यांचा समावेश आहे.

धाराशिव जिल्ह्यात चार,लातूर जिल्ह्यात पाच आणि बीड जिल्ह्यात पाच एकूण १४ झोनल अधिकारी असतील. संबंधित जिल्ह्यातील सर्व उपविभागीय अधिकारी हेच झोनल अधिकारी म्हणून काम पाहतील.

क्षेत्रीय अधिकारी,मतदान अधिकारी/ कर्मचारी यांना तीन टप्प्यात प्रशिक्षण देण्यात येत आहे.५ जून रोजी धाराशिव जिल्ह्याचे आणि ६ जून रोजी लातूर व बीड जिल्ह्यातील अधिकाऱ्यांना पहिल्या टप्प्यात प्रशिक्षण देण्यात आले आहे.दुसरे प्रशिक्षण १२ जून रोजी धाराशिव येथील जिल्हा नियोजन समिती सभागृह येथे,१३ जून रोजी लातूर व बीड जिल्हाधिकारी कार्यालय येथे आणि तिसरे प्रशिक्षण १७ जून रोजी तीनही जिल्ह्याच्या ठिकाणी हे होणार आहे.

या निवडणुकीच्या मतदान केंद्रावर लक्ष ठेवण्यासाठी बँक अधिकाऱ्यांची सूक्ष्म निरीक्षक म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. धाराशीवच्या आठ मतदान केंद्रावर ११,लातूरच्या दहा मतदान केंद्रावर १३ आणि बीडच्या अकरा मतदान केंद्रावर १४ सूक्ष्म निवडणूक निरीक्षक असे एकूण २९ मतदान केंद्रावर ३८ सूक्ष्म निरीक्षक असतील.

१८ जून २०२६ रोजी होणाऱ्या निवडणुकीचे मतदान साहित्य वितरण हे धाराशिव जिल्हाधिकारी कार्यालयातून १७ जून रोजी, मतदानासाठी दिलेल्या साहित्याची स्वीकृती ही १८ जून रोजी धाराशिव येथील भाई उद्धवराव पाटील शासकीय औद्योगिक व प्रशिक्षण संस्थेत होईल.मतमोजणी २२ जून रोजी भाई उद्धवराव पाटील शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था,धाराशिव येथे होणार आहे.

# रस्ते अपघातातील मृत्यू रोखण्यासाठी जनजागृतीवर भर द्यावा - जिल्हाधिकारी डॉ. भारत बास्टेवाड

## रस्ते सुरक्षा समितीच्या बैठकीत विविध विषयांवर चर्चा




**लातूर/प्रतिनिधी:** जिल्ह्यात रस्ते अपघातामध्ये होणारे मृत्यू रोखण्यासाठी वाहतूक नियमांविषयी जनजागृतीवर भर देण्याची आवश्यक आहे. चारचाकी चालविताना शीट बेल्टचा वापर आणि दुचाकी चालविताना हेल्मेटचा वापर केल्यास अपघाती मृत्यूंची संख्या कमी होण्यास मदत होईल, असे जिल्हाधिकारी डॉ. भारत बास्टेवाड म्हणाले. जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित रस्ते सुरक्षा समितीच्या बैठकीत ते बोलत होते.

जिल्हा पोलीस अधीक्षक अमोल तांबे, सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधीक्षक अभियंता बाबासाहेब थोरात, कार्यकारी अभियंता अलका डाके, एनआयसीचे पुरुषोत्तम रुक्मे, उप प्रादेशिक परिवहन अधिकारी आशिषकुमार अय्यर यांच्यासह संबंधित विभागांचे अधिकारी यावेळी उपस्थित होते. अपघातांविषयी माहिती संकलनासाठी आणि त्या अनुषंगाने करावयाच्या कार्यवाहीचे संनियंत्रण करण्यासाठी केंद्र शासनाने आयआरएडी पोर्टल कार्यान्वित केले आहे. जिल्ह्यातील सर्व अपघातांची माहिती संबंधित यंत्रणांनी विहित कालावधीत या पोर्टलवर अपलोड करावी. यामध्ये विलंब होणार नाही, याची दक्षता घ्यावी, असे जिल्हाधिकारी डॉ. बास्टेवाड म्हणाले. वाहतूक नियमांचे पालन केल्यास अपघातांचे प्रमाण कमी होण्यास मदत होईल. त्यामुळे नागरिकांनी वाहन चालविताना वाहतूक नियमांचे पालन करावे, असे आवाहनही त्यांनी यावेळी केले.

अपघाती मृत्यूमधील जवळपास ७० टक्के मृत्यू हे दुचाकी अपघातातील आहेत. दुचाकी चालविताना हेल्मेटचा वापर केल्यास हे मृत्यू रोखणे शक्य आहे. त्यामुळे दुचाकी चालविताना सर्वांनी हेल्मेटचा वापर करावा, असे जिल्हा पोलीस अधीक्षक अमोल तांबे म्हणाले. तसेच महामार्गांना जोडणाऱ्या रस्त्यांवर गतिरोधक बसविल्यास महामार्गावरील अपघात कमी होण्यास मदत होईल, असे त्यांनी सांगितले.

# लातूर एमआयटीत बालरोग विभागाची प्रगत व मुलभूत जीवनरक्षण प्रणाली प्रशिक्षण कार्यशाळा



**लातूर/प्रतिनिधी:** लातूर येथील एमआयएमएसआर वैद्यकीय महाविद्यालयाच्या बालरोगशास्त्र विभागातर्फे भारतीय बालरोग संघटना (इंडियन अकॅडमी ऑफ पेडियाट्रिक्स) अंतर्गत तीन दिवसीय प्रगत जीवनरक्षण प्रणाली (डव्हान्स लाईफ सपोर्ट) आणि मुलभूत जीवनरक्षण प्रणाली (बेसिक लाईफ सपोर्ट) प्रशिक्षण कार्यशाळा यशस्वीरित्या पार पडली.

एमआयएमएसआर वैद्यकीय महाविद्यालयाचे कार्यकारी संचालक आ. रमेशआप्पा कराड साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली आणि महाविद्यालय परिसर समन्वयक श्री. पृथ्वीराजदादा कराड, महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ. एन. पी. जमादार यांच्या सहकार्य व प्रोत्साहनातून वैद्यकीय महाविद्यालयातील सुसज्ज कौशल्य प्रयोगशाळा (स्किल लॅब) येथे आयोजन करण्यात आले होते.

प्रशिक्षण कार्यशाळेचा शुभारंभ वैद्यकीय महाविद्यालयाचे उपअधिष्ठाता डॉ. बी. एस. नागोबा आणि शैक्षणिक प्रकल्प संचालिका डॉ. सरिता मंत्री यांच्या हस्ते झाले. या प्रसंगी ज्येष्ठ बालरोगतज्ज्ञ डॉ. सुरेश भट्टड, लातूर आयएपीचे सचिव डॉ. किरण होळीकर व कोषाध्यक्ष डॉ. मंगेश डाके यांच्यासह बालरोग विभागातील विभाग प्रमुख, संबंधित सर्व डॉक्टर्स यांची प्रामुख्याने उपस्थिती होती.

कार्यशाळेत डॉ. भावेश शहा मिरज यांच्या नेतृत्वाखाली डॉ. दीपिका माशळकर लातूर, डॉ. उदय राजपूत सातारा, डॉ. अमोल गिरवलकर कोल्हापूर, डॉ. नरेश सोनकावडे ठाणे, डॉ. राहुल डावरे पुणे, डॉ. विनोद इंगळे छत्रपती संभाजीनगर आणि डॉ. संगीता चिवळे पुणे या राज्यभरातील तज्ज्ञ डॉक्टरांनी मार्गदर्शन केले.

लातूर एमआयटीच्या बालरोगशास्त्र विभाग प्रमुख तथा लातूर आयएपीच्या अध्यक्षा डॉ. विद्यादेवी कांदे यांच्या पुढाकारातून आणि डॉ. दीपिका माशळकर यांच्या संकल्पनेतून व समन्वयातून कार्यशाळेचा उपक्रम राबविण्यात आला. तर डॉ. शीतल भट्टड आणि डॉ. विशाखा पडिले यांनी स्थानिक पातळीवरील नियोजनात मोलाची मदत केली.

या तीन दिवसीय कार्यशाळेत आजारी बालकांमधील गंभीर लक्षणे ओळखणे, आपत्कालीन परिस्थितीचे व्यवस्थापन करणे तसेच तातडीच्या उपचारांची प्रात्यक्षिकांसह (हँड्स-ऑन) सखोल प्रशिक्षण देण्यात आले. मर्यादित जागा असलेल्या या कार्यशाळेत राज्यभरातून आलेल्या ३८ डॉक्टरांनी सहभाग घेतला होता.

बालरोग क्षेत्रातील आपत्कालीन वैद्यकीय उपचारांचा दर्जा उंचावण्यासाठी आणि डॉक्टरांचे कौशल्य वृद्धिंगत करण्यासाठी आयोजित करण्यात आलेल्या या उपक्रमाच्या यशस्वी आयोजनामागे संस्थेच्या व्यवस्थापनाचे, प्रशासनाचे आणि सर्व सहकाऱ्यांचे मोलाचे योगदान असून, आयोजक समितीने सर्वांचे मनःपूर्वक आभार मानले. या उपक्रमाबद्दल वैद्यकीय क्षेत्रातून आणि आयएपी सदस्यांकडून आयोजक समितीचे विशेष कौतुक करण्यात येत आहे.

## कार-ऑटोची भीषण धडक; अपघातानंतर सीएनजी आटोचा थरकाप उडवणारा स्फोट



**उदगीर/प्रतिनिधी:** : उदगीर-जळकोट राष्ट्रीय महामार्गावर कार आणि सीएनजी ऑटो रिक्षा यांची समोरासमोर धडक होऊन भीषण अपघात झाला. या अपघातानंतर ऑटोमधील सीएनजी टाकीचा मोठा स्फोट होऊन ऑटोने पेट घेतल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. या घटनेत ऑटो जळून खाक झाली. ही घटना शनिवारी (दि.७) दुपारी एकच्या दरम्यान घडली. ऑटो चालकाने दाखवलेल्या कमालीच्या प्रसंगावधानामुळे मोठी जीवितहानी टळली असून तो मृत्यूच्या दाढेतून सुखरूप बाहेर पडला आहे.

याबाबत अधिक माहिती अशी, कार (क्र. चक २६ ४ ३७६०) आणि सीएनजी ऑटो (क्र. चक १२ धङ ४१८१) ही दोन्ही वाहनांची नळगीर येथील प्राथमिक आरोग्य केंद्रासमोर समोरासमोर धडक झाली. ही धडक इतकी जोरदार होती की, ऑटोमधील सीएनजी टाकीचा मोठा स्फोट झाला आणि बघता बघता संपूर्ण ऑटो आगीच्या ज्वालांच्या विळख्यात सापडला.

ऑटोचालक ऑटोत एकटाच होता. धडकेनंतर तो तातडीने ऑटोतून बाहेर पडल्याने त्याचा जीव वाचला. ऑटो आगीत भस्मसात होत असताना परिसरात धुराचे मोठे लोट पसरले होते. अपघातानंतर राष्ट्रीय महामार्गावर वाहनांच्या रांगा लागल्या. घटनास्थळी नागरिकांची मोठी गर्दी जमली होती. त्यामुळे काही काळ वाहतूक पूर्णपणे विस्कळीत झाली. घटनेची माहिती मिळताच पोलीस आणि संबंधित यंत्रणा घटनास्थळी दाखल झाली. या अपघातात सुदैवाने कोणतीही जीवितहानी झाली नसली तरी ऑटोचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे.

# हवामान सारांश/चेतावनी

प्रादेशिक हवामान केंद्र,मुंबई येथून प्राप्त झालेल्या अंदाजानुसार दिनांक ०९ जून रोजी परभणी, बीड, नांदेड, लातूर, धाराशिव जिल्हयात तर दिनांक १० जून रोजी बीड, लातूर,धाराशिव जिल्हयात तर दिनांक ११ जून रोजी बीड, धाराशिव जिल्हयात तर दिनांक १२ जून रोजी बीड, लातूर व धाराशिव जिल्हयात तूरळक ठिकाणी वादळी वारा, मेघगर्जना, वाऱ्याचा वेग अधिक (ताशी ३० ते ४० कि.मी.) राहून हलक्या ते मध्यम पावसाची शक्यता आहे. मराठवाडयात पुढील चार दिवसात तूरळक ठिकाणी वादळीवाऱ्यासह हलक्या ते मध्यम स्वरूपाच्या पावसाची शक्यता आहे. मराठवाडयात पुढील दोन दिवसात कमाल तापमानात १ ते २ अं.से. ने घट होऊन त्यानंतर फारशी तफावत जाणवनार नाही.

**सामान्य सल्ला :**

विस्तारीत अंदाजानुसार (ईआरएफएस) मराठवाडयात दिनांक १२ ते १८ जून २०२६ दरम्यान पाऊस सरासरीपेक्षा जास्त, कमाल तापमान व किमान तापमान सरासरीएवढे ते सरासरीपेक्षा किंचित जास्त राहण्याची शक्यता आहे.

**संदेश**

सध्याचा होणारा पाऊस हा पूर्व मौसमी पाऊस असल्यामूळे शेतकऱ्यांनी पेरणीची घाई करू नये. जमिनित वापसा असतांना पूर्व मशागतीची कामे राहिली असल्यास पूर्व मशागतीची कामे करून घ्यावीत.

वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी येथील ग्रामीण कृषि मौसम सेवा योजनेतील तज्ञ समितीने पुढील प्रमाणे कृषि हवामान आधारीत कृषि सल्ल्याची शिफारश केली आहे.

**पीक व्यवस्थापन**

**कापूस पिकाच्या लागवडीसाठी:-** वाण निवडताना जमिन व हवामान, कोरडवाहू किंवा बागायती, लागवडीचा प्रकार व वाणांचे गुणधर्म यांचा विचार करून वाणांची निवड करावी. बीटी कपाशीमध्ये कापूस + तूर (४-६:१ किंवा ६-८:२), कापूस + सोयाबीन (१:१), कापूस + मूग (१:१) रुंद ओळींमध्ये कापूस + मूग (१:२), कापूस + उडीद (१:१) ही आंतरपीक पध्दती घेतल्यास फायदेशीर ठरते.

**तुर पिकाच्या पेरणीसाठी:-** बीडीएन-७११, बीडीएन-७१६, बीडीएन-२०१३-४१ (गोदावरी), बीडीएन-२०१३-२ बीएसएमआर-७३६, बीएसएमआर-८५३ (वैशाली), बीडीएन-२, बीडीएन-७०८ (अमोल), पीकेव्ही तारा इत्यादी वाणांचा वापर करावा. तुरीचे उत्पादन वाढविण्यासाठी तसेचे जमिनीची उत्पादकता राखण्यासाठी तुर + बाजरी (२:४), तुर + सोयाबीन/मुग/उडीद (१:२ किंवा २:४) असे ओळीचे प्रमाण ठेवून फायदेशीर आंतरपीक पध्दतीचा वापर केल्यास अधिक फायदा होतो.

**मुग पेरणीसाठी:-** बीएम-२००२-१, बीएम-२००३-२, कोपरगाव, बीएम-४, बीपीएमआर-१४५, फुले सुवर्णा, फुले चेतक, फुले मुग २, पी.के.व्ही.ए.के.एम ४ इत्यादी वाणांचा वापर करावा तर उडीद लागवडीसाठी बीडीयु-१, टीएयू-१, फुले राजन, फुले वसू, टीपीयू-४ इत्यादी वाणांचा वापर करावा. आंतरपीक म्हणून मुग/उडीद या पिकांना विशेष महत्व प्राप्त आहे, ते या पिकांच्या कालावधीमुळे, हे दोन्हीही पिके तुर, ज्वारी, कपाशीत आंतरपीक म्हणून घेता येतात.

**भुईमूग पिकाच्या लागवडीसाठी:-** एसबी-११, जेएल-२४, एलजीएन-२ (मांजरा), टीएजी-२४, टीजी-२६, टीएलजी-४५, एलजीएन-१, एलजीएन-१२३ इत्यादी वाणांचा वापर करावा.

मका पिकाच्या पेरणीसाठी:- नवज्योत, मांजरा, डीएमएच-१०७, केएच-९४५१, एमएचएच, प्रभात, करवीर, जेके-२४९२, महाराजा, यूवराज इत्यादी वाणांचा वापर करावा.

**फळबागेचे व्यवस्थापन**

नविन केळी बाग लागवडीसाठी ग्रँड नाईन, अर्धापूरी, बसराई (देशावर), श्रीमंती, फुले प्राईड इत्यादी जातींचा वापर करावा.पूर्वी लागवड केलेल्या बागेत आंतर मशागतीची कामे पूर्ण करून घ्यावी. लागवडीसाठी शासकीय नोंदणीकृत रोपवाटीकेतूनच रोपांची खरेदी करावी. नविन लागवड केलेल्या केळी झाडांना काठीने आधार द्यावा. केळी बागेस आवश्यकतेनूसार पाणी द्यावे.

**नविन आंबा बाग लागवडीसाठी:-** केसर, पायरी, तोतापूरी, निलम, सिंधू, साईसुगंध, वनराज, लंगडा, रत्ना, परभणी भूषण, निरंजन मल्लीका, दशेहरी इत्यादी जातींचा वापर करावा. लागवडीसाठी शासकीय नोंदणीकृत रोपवाटीकेतूनच रोपांची खरेदी करावी. आंबा बागेस आवश्यकतेनूसार पाणी द्यावे.

द्राक्ष बागेतील रोगग्रस्त पाने काढून टाकावीत व रोगनाशकाची फवारणी करावी. द्राक्ष बागेत आवश्यकतेनूसार पाणी व्यवस्थापन करावे.

**नविन सिताफळ बाग लागवडीसाठी:-** बालानगर, टिपी-७, धारुर-६, अर्कासहान इत्यादी जातींचा वापर करावा. लागवडीसाठी शासकीय नोंदणीकृत रोपवाटीकेतूनच रोपांची खरेदी करावी.

**भाजीपाला**

पाण्याची उपलब्धता असलेल्या शेतकऱ्यांनी भाजीपाला पिकाची गादी वाफ्यावर रोपे तयार करण्यासाठी बी टाकले नसल्यास टाकून घ्यावे. काढणीस तयार असलेल्या भाजीपाला पिकाची काढणी करून घ्यावी. वादळी वाऱ्यासह पावसाचा अंदाज लक्षात घेता, नविन लागवड केलेल्या व लहान वेलवर्गीय झाडांना काठीने आधार द्यावा.

**फुलशेती**

पाण्याची उपलब्धता असलेल्या शेतकऱ्यांनी हंगामी फुलपिकांच्या लागवडीसाठी गादीवाफ्श्यावर बी टाकून रोपे तयार करावी. वादळी वाऱ्यासह पावसाचा अंदाज लक्षात घेता, काढणीस तयार असलेल्या फुलपिकांची काढणी करून घ्यावी.

**पशुधन व्यवस्थापन**

उन्हाळयातील उष्ण तापमान संपूण अचानक झालेला वातावरणातील बदल, ओलसर व दमट वातावरणामूळे जनावरांमध्ये रोगाचा प्रादूर्भाव वाढण्याची दाट शक्यता असते. त्यासाठी जनावराचे आरोग्य उत्तम व निरोगी ठेवण्यासाठी खालील उपाययोजना कराव्यात : जनावरे बांधणाऱ्या जागी पावसाचे पाणी जमा होणार नाही व गोठा ओलसर होऊ नये याची काळजी घ्यावी. गोठयातील आर्द्रता व दमटपणा कमी होण्यासाठी, गोठयामध्ये मूबलक प्रमाणात खेळती हवा व सूर्यप्रकाश उपलब्ध करावा. पावसाळ्यात दूभत्या जनावराची कास पोटॅशियम पॅरामॅग्नेटच्या पाण्यातील द्रावणाने स्वच्छ धूवून काढावे. पावसाळयात मूख्यत: जनावरे झाडाखाली किंवा उघड्यावर बांधू नयेत. पावसाळयात जनावरांना कोवळा, हिरवा चारा जास्त प्रमाणात देणे टाळावे.

**सौजन्य**

**मुख्य प्रकल्प समन्वयक,**
**ग्रामीण कृषी मौसम सेवा,वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ, परभणी**

## चाकूर बसस्थानकातील सीसीटीव्ही तीन महिन्यांपासून बंद; प्रवाशांच्या सुरक्षिततेचा प्रश्न गंभीर

**चाकूर/प्रतिनिधी:** : तालुक्याचे प्रमुख केंद्र असलेल्या चाकूर येथील राज्य परिवहन महामंडळाच्या बसस्थानकातील सीसीटीव्ही कॅमेरे गेल्या तीन महिन्यांपासून बंद असल्याने प्रवाशांच्या सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. महिला, विद्यार्थिनी आणि नागरिकांमध्ये याबाबत चिंता व्यक्त केली जात असून, या गंभीर परिस्थितीस जबाबदार कोण, असा सवाल उपस्थित केला जात आहे.बातम्यांचे पॉडकास्ट

बसस्थानकातील मूलभूत सुविधांची अवस्था दिवसेंदिवस खालावत चालल्याने प्रवाशांमध्ये नाराजीचे वातावरण आहे. सीसीटीव्ही यंत्रणा बंद असल्यामुळे चोरी, छेडछाड अथवा इतर अनुचित प्रकार घडल्यास त्याची नोंद घेणे कठीण होणार असल्याची भीती व्यक्त केली जात आहे. विशेषतः महिला व मुलींच्या सुरक्षेसाठी महत्त्वाची असलेली ही यंत्रणा दीर्घकाळापासून बंद असल्याने नागरिकांमध्ये असुरक्षिततेची भावना वाढीस लागली आहे.

राष्ट्रीय महामार्गाच्या चुकीच्या नियोजनामुळे अपघातांचे सत्र सुरुच

बसस्थानक प्रशासनाकडून वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे वारंवार पत्रव्यवहार करूनही समस्येचे निराकरण होत नसल्याची माहिती समोर आली आहे. त्यामुळे स्थानिक पातळीवरील प्रयत्नांकडे दुर्लक्ष होत असल्याची चर्चा सुरू आहे.

सीसीटीव्हीप्रमाणेच बसस्थानकातील पंखे, फोकस लाईट आणि इतर सुविधाही अनेक दिवसांपासून बंद आहेत. संपूर्ण परिसरात केवळ एकच फोकस लाईट सुरू असल्याने रात्रीच्या वेळी बसस्थानक अंधारात बुडालेले असते. यामुळे रात्री मुक्कामी असणारे चालक व वाहक यांच्या सुरक्षेचाही प्रश्न निर्माण झाला आहे. वाहकांकडे दिवसभरातील तिकीट विक्रीची रोख रक्कम असल्याने चोरीच्या घटनांची शक्यता नाकारता येत नाही.

अहमदपूर तालुक्यात ३१ गावे, १० वाडी- तांड्याना पाणीटंचाईच्या झळा

चाकूर हे तालुक्याचे मुख्य ठिकाण असूनही प्रवाशांसाठी आवश्यक सुविधा उपलब्ध नसल्याने नागरिकांमध्ये नाराजी वाढत आहे. जिल्ह्यातील अनेक तालुक्यांमध्ये आणि छोट्या गावांमध्ये नवीन बसस्थानके उभारली गेली असताना चाकूर बसस्थानकाच्या विकासाकडे दुर्लक्ष होत असल्याची भावना नागरिक व्यक्त करत आहेत.

स्थानिक लोकप्रतिनिधी आणि संबंधित प्रशासनाने या प्रश्नाकडे गांभीर्याने लक्ष देऊन बंद पडलेले सीसीटीव्ही कॅमेरे, लाईट व पंखे तातडीने सुरू करावेत. तसेच चाकूरसाठी आधुनिक सुविधांनी युक्त नवीन बसस्थानक मंजूर करून विकास प्रक्रियेला गती द्यावी, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

दरम्यान, या संदर्भात विभाग नियंत्रक राठोड यांच्याशी संपर्क साधण्याचा प्रयत्न करण्यात आला असता त्यांनी प्रतिसाद दिला नाही.


प्रो. जडे यांचे रबरी शिक्के
कॉम्प्युटर नॉयलॉन रबर असलेले
टिकाऊ रबरी शिक्के
तयार करून मिळतील.



शाखा १.
जडे-भारत प्रिंटिंग प्रेस, मेनरोड, लातूर
शाखा २.
जडेऑफसेट प्रिंटर्स, मित्र नगर, लातूर
संपर्क: (०२३८२) २४२६०८,२४५४०९

# आयटीआयसाठी अर्ज करण्याची अंतिम मुदत २१ जून
## २५ जूनला प्राथमिक गुणवत्ता यादी जाहीर होणार

धाराशिव (प्रतिनिधी)-धाराशिव व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालयातर्फे राज्यातील शासकीय व खासगी औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमधील (आयटीआय) प्रवेश प्रक्रिया सुरू झाली आहे. या प्रवेश प्रक्रियेला विद्यार्थ्यांचा यंदा चांगला प्रतिसाद मिळत असून, विद्यार्थ्यांना दि. २१ जून २०२६ पर्यंत ऑनलाईन अर्ज व शुल्क भरण्याची अंतिम मुदत देण्यात आली आहे. धाराशिव जिल्ह्यातील ०८ शासकीय व ११ खाजगी आयटीआयमध्ये एकूण २,८२७ जागा उपलब्ध आहेत. या प्रवेश प्रक्रियेला दि. २१ मे पासून सुरुवात झाली आहे.

आयटीआयचे ऑनलाईन अर्ज https://admission.dvet.gov.in या संकेतस्थळावर करता येतील. जिल्ह्यातील प्रत्येक आयटीआयमध्ये प्रवेश अर्ज स्वीकार केंद्र स्थापन करण्यात आले आहेत, अशी माहिती धाराशिव शहरातील भाई उद्धवराव पाटील शासकीय आयटीआयमधील प्रवेश समन्वयक अतिश सुरवसे यांनी दिली.

प्रवेश प्रक्रियेचे सविस्तर वेळापत्रक जाहीर करण्यात आले असून, दि. २१ जूनपर्यंत विद्यार्थ्यांना ऑनलाईन अर्जासह संबंधित ट्रेडसाठी शुल्क भरण्याची अंतिम मुदत आहे. त्यानंतर दि. २२ जूनपर्यंत प्रवेश अर्ज निश्चितीची प्रक्रिया चालणार आहे. जिल्ह्यातील ८ शासकीय व ११ खाजगी औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमधील ऑगस्ट २०२६ सत्राच्या प्रवेश प्रक्रियेला विद्यार्थ्यांचा चांगला प्रतिसाद मिळत आहे. शनिवारपर्यंत राज्यभरात १ लाख १२ हजार २४६ विद्यार्थ्यांनी नोंदणी केली आहे. पहिल्या प्रवेश फेरीसाठी व्यवसाय व संस्थानिहाय प्राधान्यक्रम नोंदविण्यास २३ जूनपर्यंत मुदत देण्यात आली आहे. संचालनालयाकडून २५ जून रोजी प्राथमिक गुणवत्ता यादी प्रसिद्ध केली जाणार आहे, अशी माहिती देण्यात आली आहे.

प्रवेशासाठी अर्ज करताना ही लागतील कागदपत्रे शासकीय व खासगी औद्योगिक प्रशिक्षण संस्थोतील आयटीआयची प्रवेशप्रक्रिया सुरू झाली असून दि.२१ जून अंतिम मुदत आहे. त्यासाठी विद्यार्थ्यांना शाळा सोडल्याचा दाखला, १० वीची गुणपत्रिका, आधारकार्ड, जात प्रमाणपत्र (लागू असल्यास), नॉन क्रीमिलयर (लागू असल्यास), रहिवाशी प्रमाणपत्राची झेरॉक्स लागते. प्रवेश घेताना मूळ कागदपत्रे दाखवावी लागणार आहेत.

# खत-बियाण्यांच्या नावाखाली शेतकऱ्यांची लूट? प्रशासन झोपेत, शेतकरी अडचणीत!

धाराशिव (रामेश्वर डोंगरे) धाराशिव जिल्ह्यात सध्या खरीप हंगामाच्या पेरणीची लगबग सुरू झाली आहे. शेतकरी दिवसरात्र मेहनत करून शेत तयार करत आहेत. मात्र पेरणीच्या या धावपळीत सर्वात मोठा प्रश्न उभा राहिला आहे तो म्हणजे खत आणि बियाण्यांच्या गुणवत्तेचा आणि किंमतीचा! शेतकऱ्यांच्या घामाच्या पैशावर डल्ला मारणारी यंत्रणा नेमकी कोणाच्या आशीर्वादाने सुरू आहे, असा सवाल आता शेतकरी वर्गातून उपस्थित होत आहे.

शेतकऱ्यांना खत आणि बियाणे कृषी सेवा केंद्रातून मिळते. कृषी सेवा केंद्रांना हे साहित्य विविध कंपन्यांकडून पुरवले जाते. मात्र या खत-बियाण्यांची गुणवत्ता तपासली जाते का? कंपनीकडून आलेल्या मालाची नियमित तपासणी होते का? शेतकऱ्यांच्या हातात पोहोचणारा माल खरोखर दर्जेदार आहे की नाही, यावर नियंत्रण कोणाचे आहे? असे अनेक प्रश्न अनुत्तरित आहेत.

विशेष म्हणजे अनेक वेळा बाजारात खत आणि बियाण्यांच्या पिशव्यांवर छापलेली एमआरपी आणि प्रत्यक्षात घेतली जाणारी किंमत यात मोठा फरक दिसून येतो. काही ठिकाणी आधी किंमत वाढवून नंतर सवलतीचा देखावा केला जातो. त्यामुळे शेतकऱ्याला नेमकी मूळ किंमत किती आणि तो किती पैसे जास्त मोजत आहे, याचा हिशोबच लागत नाही. परिणामी शेतकऱ्याच्या खिशाला कात्री लागते आणि त्याची फसवणूक होते.

सर्वात गंभीर बाब म्हणजे प्रशासनाकडे तक्रार गेल्याशिवाय या विषयाकडे फारसे लक्ष दिले जात नाही. तक्रार आली तर चौकशी, अन्यथा सर्व काही सुरळीत असल्याचे चित्र दाखवले जाते. त्यामुळे निकृष्ट दर्जाचे खत, संशयास्पद बियाणे आणि वाढीव दराने विक्री यावर प्रभावी नियंत्रण राहत नाही. याचा थेट फटका शेतकऱ्यांच्या उत्पादनाला आणि आर्थिक स्थितीला बसतो.

आज शेतकरी पेरणीसाठी हजारो रुपये खर्च करत आहे. जर सुरुवातीलाच निकृष्ट दर्जाचे बियाणे किंवा खत त्याच्या पदरी पडले, तर संपूर्ण हंगाम धोक्यात येऊ शकतो. मग नुकसानभरपाईसाठी सरकारी कार्यालयांचे उंबरठे झिजवण्याची वेळ त्याच्यावर येते. त्यामुळे पेरणीपूर्वीच खत-बियाणे विक्री केंद्रांची तपासणी, एमआरपी पडताळणी आणि गुणवत्तेची चाचणी ही प्रशासनाने तातडीने हाती घेणे गरजेचे आहे.

धाराशिव जिल्ह्यातील कृषी विभाग, पुरवठा विभाग आणि संबंधित यंत्रणांनी आता जागे होऊन बाजारावर करडी नजर ठेवण्याची गरज आहे. अन्यथा शेतकरी राजा म्हणायचे आणि दुसरीकडे त्याच्याच खिशाला कात्री लावायची, अशी परिस्थिती कायम राहील.

# परंडा तालुक्यातील केळी-पपई बागांचे मोठे नुकसान



परंडा (प्रतिनिधी)- तालुक्यात वादळी वाऱ्यामुळे केळी व पपईच्या बागांचे मोठे नुकसान झाले असून, संबंधित शेतकऱ्यांना तातडीने नुकसानभरपाई देण्याची मागणी शेतकरी करीत आहेत.

तालुक्यातील परिसरात रविवारी (दि. ७) रात्री वादळी वाऱ्यासह झालेल्या पावसात केळी, आंबा, पपई आदी बागांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. मागील आठवड्यातही वादळी वाऱ्यामुळे परंडा तालुक्यातील केळी व पपईची हानी झाली होती. याबाबत शेतकरी आक्रमक झाले असून आर्थिक मदतीची मागणी करीत आहेत.

भोंजा, अनाळा, पाचपिंपळा, डोंजा आदी परिसरातील केळी व पपई उत्पादक शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले आहे. वर्षभर रक्ताचे पाणी करून, अहोरात्र कष्ट करून, लाखो रुपयांचे कर्ज काढून शेतकऱ्यांनी केळीच्या बागा जोपासल्या होत्या. पीक कापणीच्या अवस्थेत असताना अचानक आलेल्या वादळाने होत्याचे नव्हते केले. संपूर्ण बागा जमिनदोस्त झाल्या आहेत. हातातोंडाशी आलेला घास निसर्गाने हिरावून घेतला असून प्रशासनाच्या दिरंगाईवरही शेतकऱ्यांनी नाराजी व्यक्त केली आहे. त्यामुळे तातडीने सर्वेक्षण करून सरकारने नुकसानभरपाई द्यावी, अशी मागणी करण्यात आली आहे. प्रशासनाने तातडीने पावले उचलली नाहीत, तर शेतकरी अन्यायाविरोधात तीव्र आंदोलन छेडतील, असा इशाराही देण्यात आला आहे.

वादळात भोंजा हवेलीतील शेतकऱ्याचे मोठे नुकसान भोंजा हवेली येथील केळी उत्पादक शेतकरी जीवन मोरे यांची वादळी वाऱ्यामुळे केळीची बाग पूर्णपणे भुईसपाट झाली आहे. रविवारी रात्री झालेल्या जोरदार वादळी वाऱ्यासह पावसामुळे बागेतील सर्व केळी झाडे जमीनदोस्त झाली. कापणीच्या अवस्थेत असलेले पीक नष्ट झाल्याने शेतकऱ्याचे मोठे आर्थिक नुकसान झाले आहे. वर्षभर केलेल्या कष्टांवर पाणी फिरले असून, या नुकसानीमुळे सुमारे ५ लाख रुपयांचा फटका बसल्याचे त्यांनी सांगितले आहे. शासनाने तातडीने पंचनामा करून नुकसानभरपाई द्यावी, अशी मागणीही त्यांनी केली आहे.

# येडेश्वरी मंदिर परिसरात वाहतूक कोंडी



कळंब (प्रतिनिधी)- तालुक्यातील येरमाळा येथील श्रीक्षेत्र येडेश्वरी देवी मंदिर परिसरात मंगळवारी मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी निर्माण झाली असून येरमाळा पोलिसांच्या निष्क्रियतेमुळे हजारो भाविकांना मनस्ताप सहन करावा लागल्याची तीव्र भावना भाविक व स्थानिक नागरिकांमधून व्यक्त होत आहे.वृत्तपत्र सदस्यता

मंगळवार हा देवीचा वार असल्याने पहाटेपासूनच मंदिर परिसरात भाविकांची मोठी गर्दी होती. मात्र मुख्य रस्त्यावर दुचाकी व चारचाकी वाहने आडवी-तिडवी उभी करण्यात आली होती. वाहतुकीचा पूर्णपणे बोजवारा उडाला असतानाही पोलिसांकडून कोणतीही प्रभावी उपाययोजना करण्यात आली नसल्याचे भाविकांचे म्हणणे आहे.

सकाळी साडेअकराच्या सुमारास मंदिर परिसरात वाहनांच्या रांगा लागल्या होत्या. मुख्य रस्त्यावर वाहने अडकल्याने अनेक भाविकांना दर्शनासाठी पायी चालत जाण्याची वेळ आली. वृद्ध, महिला आणि लहान मुलांसह आलेल्या भाविकांना मोठा त्रास सहन करावा लागला. एवढी गंभीर परिस्थिती निर्माण होऊनही वाहतूक नियंत्रणासाठी पोलिसांचा ठोस बंदोबस्त दिसून आला नाही, अशी नाराजी व्यक्त होत आहे.

मंदिर परिसरातील व्यापाऱ्यांनाही या वाहतूक कोंडीचा फटका बसत आहे. ग्राहकांना दुकानांपर्यंत पोहोचणे कठीण होत असल्याने व्यवसायावर परिणाम होत असल्याचे व्यापाऱ्यांनी सांगितले. गर्दीच्या दिवशी पोलीस केवळ बघ्याची भूमिका घेतात. वाहनचालकांवर नियंत्रण नसल्याने दर आठवड्याला हीच परिस्थिती निर्माण होते, अशी प्रतिक्रिया काही स्थानिकांनी व्यक्त केली.

येडेश्वरी देवीच्या दर्शनासाठी येणाऱ्या हजारो भाविकांच्या सोयीसाठी वाहतूक व्यवस्था सुरळीत ठेवणे ही पोलिसांची प्राथमिक जबाबदारी असताना त्याकडे होत असलेल्या दुर्लक्षाबाबत भाविक व नागरिकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत असून वरिष्ठ अधिकाऱ्यांनी या प्रकाराची दखल घेऊन संबंधितांवर जबाबदारी निश्चित करावी, अशी मागणी होत आहे.

लातूर समाचार धाराशिव
बातम्या,लेख व जाहिराती साठी संपर्क
9422472502
9175325708
9284321472

# पिके, घरे आणि जनावरांचे मोठे नुकसान; अंजनसोंडा येथे विजेचा प्रवाह सुरू राहिल्याने दोन म्हशी दगावल्या

भूम : शहरासह संपूर्ण तालुक्यात गेल्या पाच दिवसांपासून सुरू असलेल्या अवकाळी पाऊस आणि वादळी वाऱ्याने अक्षरशः धुमाकूळ घातला आहे. मुसळधार पावसामुळे शेतकरी व सामान्य नागरिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असून अनेकांचे संसार उघड्यावर आले आहेत. याच पार्श्वभूमीवर ईटजवळील अंजनसोंडा येथे विद्युत प्रवाहाच्या धक्क्याने दोन म्हशी दगावल्याची धक्कादायक घटना घडली असून एका भूमिहीन शेतकऱ्याला सुमारे अडीच लाख रुपयांचा आर्थिक फटका बसला आहे.

सायंकाळी आठ वाजल्यापासून सुरू झालेला पाऊस रात्रभर कोसळत राहिला. तालुक्यातील पाचही मंडळांमध्ये सरासरी ८५.४ मिलिमीटर म्हणजेच ६५ टक्के पावसाची नोंद झाली. यामध्ये माणकेश्वर मंडळात सर्वाधिक १००.४ मिमी, आंबी मंडळात ८१ मि.मी., भूम मंडळात ८२.८ मिमी, वालवड मंडळात ७७.४ मिमी आणि ईट मंडळात ८४.६ मिमी पावसाची नोंद झाली.अतिवृष्टीमुळे वारेवडगाव, भोगलगाव आणि कासारी परिसरातील केळीच्या बागा जमीनदोस्त झाल्या आहेत.

उभी पिके आडवी पडल्याने शेतकऱ्यांच्या वर्षभराच्या मेहनतीवर पाणी फिरले आहे. अनेक घरांवरील पत्रे उडून गेली असून काही घरांची पडझड झाली आहे. तसेच अंगणवाडी, वाचनालय आणि इतर सार्वजनिक इमारतींचेही नुकसान झाले आहे. वादळी वाऱ्यामुळे अनेक ठिकाणी वीज खांब कोसळून वीजपुरवठा खंडित झाला असून मोठमोठी झाडे रस्त्यावर पडल्याने वाहतुकीलाही अडथळे निर्माण झाले आहेत.दरम्यान, ईट येथून जवळ असलेल्या अंजन सोंडा गावात महावितरणच्या कथित निष्काळजीपणामुळे दोन म्हशींचा मृत्यू झाला.

अशोक कुचेकर हे नेहमीप्रमाणे आपल्या म्हशी बांधावरून घेऊन जात असताना जमिनीवर पडलेल्या विद्युत तारेला म्हशींचा स्पर्श झाला. या तारांचे कनेक्शन एक वर्षापूर्वी गावकऱ्यांनी बंद केल्याचे सांगितले जात असले तरी अलीकडील पावसानंतर त्या तारांमध्ये पुन्हा विद्युत प्रवाह सुरू झाल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे.

विद्युत धक्का बसल्याने दोन्ही म्हशी जागीच दगावल्या.नुकसानग्रस्त शेतकरी व नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले असून शासनाने तातडीने पंचनामे करून आर्थिक मदत जाहीर करावी, अशी मागणी जोर धरत आहे. तसेच अंजन सोंडा येथील घटनेची चौकशी करून संबंधित जबाबदार कर्मचाऱ्यांवर गुन्हा दाखल करावा आणि मृत म्हशींच्या मालकाला तत्काळ नुकसानभरपाई द्यावी, अशी मागणी ग्रामस्थ व युवकांकडून करण्यात येत आहे.

महावितरणबद्दल नाराजी

या घटनेमुळे अशोक कुचेकर यांचे सुमारे अडीच लाख रुपयांचे नुकसान झाले आहे. गावकऱ्यांनी महावितरणच्या कारभारावर तीव्र नाराजी व्यक्त करत संबंधित कर्मचारी व अधिकाऱ्यांवर कारवाईची मागणी केली आहे. महावितरणचे कर्मचारी दोन ते चार महिने गावात फिरकत नाहीत. किरकोळ कामे गावकरी स्वतःच करतात. अधिकाऱ्यांना फोन केल्यास प्रतिसाद मिळत नाही, असा आरोप स्थानिकांनी केला.

# धाराशिव पोलिसांची अवैध मद्य विरोधी कारवाई

कळंब पोलीस ठाणे अंतर्गत पोपट वय ८० वर्षे, रा. ह.मु. मार्केट यार्ड कळंब ता. कळंब जि. धाराशिव हे दि.०८.०६.२०२६ रोजी वजन काटा मार्केट यार्ड जवळ कळंब येथे अंदाजे २,००० किंमतीची २० लिटर गावठी दारु अवैध विक्रीच्या उद्देशाने जवळ बाळगलेली जप्त करण्यात आली. यावरुन पोलीसांनी अवैध मद्य जप्त करुन नमूद व्यक्तीविरुध्द महाराष्ट्र मद्य मनाई कायदा कलम-६५(ई) अन्वये कळंब पो ठाणे येथे गुन्हा नोंदविला आहे.

नळदुर्ग पोलीस ठाण अंतर्गत अशोक वय ६० वर्षे, रा. बसवेश्वर नगर चिवरी ता. तुळजापूर जि. धाराशिव हे दि.०८.०६.२०२६ रोजी बसवेश्वर नगर चिवरी येथे अंदाजे ८,५०० किंमतीची ८० लिटर गावठी दारु अवैध विक्रीच्या उद्देशाने जवळ बाळगलेली जप्त करण्यात आली. यावरुन पोलीसांनी अवैध मद्य जप्त करुन नमूद व्यक्तीविरुध्द महाराष्ट्र मद्य मनाई कायदा कलम-६५(ई) अन्वये नळदुर्ग पो ठाणे येथे गुन्हा नोंदविला आहे.

लोहारा पोलीस ठाणे अंतर्गत इस्माभाई वय ३७ वर्षे, रा. जेवळी उत्तर ता. लोहारा जि. धाराशिव हे दि.०८.०६.२०२६ रोजी जेवळी गावातील इस्माईल बिर्याणी हॉटेलच्या बाजूस अंदाजे १,९०० किंमतीच्या देशी विदेशी दारुच्या १९ सिलबंद बाटल्या अवैध विक्रीच्या उद्देशाने जवळ बाळगलेल्या जप्त करण्यात आल्या. यावरुन पोलीसांनी अवैध मद्य जप्त करुन नमूद व्यक्तीविरुध्द महाराष्ट्र मद्य मनाई कायदा कलम-६५(ई) अन्वये लोहारा पो ठाणे येथे गुन्हा नोंदविला आहे.

**Name of Change Declaration**
Here in this advertise i am declaring that i have change My Name which was :
SARUK NAMRATA BABASAHEB TO NAMRATA OMKAR TAMBADE
Hence for this Declaration i will be known by this name and will use NAMRATA OMKAR TAMBADE in future the same will used by my family husband /wife, children and relative.
OLD NAME :- SARUK NAMRATA BABASAHEB
NEW NAME :- NAMRATA OMKAR TAMBADE
Address - Pitruchhaya Niwas Kaij Road At Post Ghatnadur Taluka Kaij DIST. Beed Maharashtra India-431126
Adhar No.-232739205943 Mob.9613201212

## धाराशिव शहरातील कांही महत्वाचे फोन नंबर

१) रुग्णवाहिका २२३९७६
२) रक्तपेढी २२३९७६
३) जिल्हा रुग्णालय २२६९२७
४) शहरपोलिस स्टेशन२४०९९९
५) अग्नीशामक विभाग २२२१०१
६) रेल्वेस्टेशन २४०९९९
७) एसपी कार्यालय २२७६२०
८) जिल्हाधिकारी का.२२४५०१
९) तहसिल का. २२७८८२
१०) जि.प. २२५४०७
११)नगरपरिषद २२५४०७
१२)जिल्हा माहिती अधिकारी ०२४७२-२२२७४४
१३) जिल्हा उद्योग केंद्र (डीआयसी) ०२४७२-२२२२२६
१४) उस्मानाबाद जिल्ह्याचे उपसंचालक ०२४७२-२२७८ ९ २
१५) उप विभागीय वन कार्यालय, उस्मानाबाद ०२४७२-२२३४०८
१६)अधीक्षक उत्पादन शुल्क कार्यालय ०२४७२-२२३३८७
१७) जिल्हा कल्याण अधिकारी ०२४७२-२२२०१४
१८) प्रादेशिक परिवहन अधिकारी (आरटीओ) ०२४७२-२२२५५५
१९) मुख्य पोस्ट ऑफिस ०२४७२-२२२२९४
२०) जिल्हा रोजगार अधिकारी ०२४७२-२२२२३६
२१) विभागीय नियंत्रक (एमएसआरटीसीसी) ०२४७२-२२२२१६
२२) लातूर समाचार ९४२२४७२५०२
बीडीओ, एम.आर.ए.जी.एस. जिल्हा परिषद ०२४७२-२२०६११
२३)मुख्य कार्यकारी अधिकारी ०२४७२-२२६८४०
२४) २४) अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी ०२४७२-२५) २२३३९७ प्रकल्प संचालक ०२४७१-२२१५५२
२५) उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य प्रशासन) ०२४७२-२२३३८८
२६) उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्राम पंचायत) ०२४७२-२२३३४३
२७) उप मुख्य कार्यकारी अधिकारी (स्त्री व मुल) ०२४७२-२२२५७०
२८) मुख्य खाते व वित्त अधिकारी ०२४७२-२२२१३२
२९) शिक्षण अधिकारी (प्राथमिक) ०२४७२-२२४१८४
३०) शिक्षण अधिकारी (माध्यमिक) ०२४७२-२२४१८४

सांज दैनिक लातूर समाचार हे मुद्रक,प्रकाशक,संपादक व मालक दयानंद शंकर जडे, यांनी जडे ऑफसेट प्रिंटर्स, मित्रनगर, लातूर येथे छापून समर्थनगर धाराशिव येथे प्रकाशित केले आहे.
Evening Daily Latur Samachar is Published by Dayanand Shankar Jade from Samarth Nagar,Dharashiv on behalf of Dayanand Shankar Jade ,edited by Dayanand Shankar Jade and Printed by Dayanand Shankar Jade at Jade Offset Printers,Mitra Nagar,Latur. Editor : Dayanand Shankar Jade Mob:9422472502 RNI- MAHMAR/2003/11649